adivasi resource centre
Bridging Civil Society & Legislative Gap

NCAS
FACILITATING SOCIAL CHANGE

# कहाणी यशस्वी सामूहिक वनहक्क दाव्यांची

## मेंढा (लेखा) व मारदा गावांची

लता प्रतिभा मधुकर

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ आणि नियम २००८ नुसार केलेल्या मेंढा (लेखा) व मारदा गावातील सामूहिक वनहक्क दाव्यांच्या प्रक्रियेचा दस्तऐवज

कहाणी यशस्वी सामूहिक वनहक्क दाव्यांची :
मेंढा (लेखा) व मारदा गावांची

लेखिका : लता प्रतिभा मधुकर

समन्वयक : क्षमता विकास विभाग, एनकॅस, पुणे

अक्षर जुळणी : महादेव उपाडे, सुजय अडसूळ

विशेष सहकार्य : मोहन हिराबाई हिरालाल, वृक्षमित्र, चंद्रपूर – गडचिरोली; देवाजी तोफा, मेंढा (लेखा), गडचिरोली; सुबोध कुलकर्णी, ज्ञानप्रबोधिनी, गडचिरोली, नितीन बारसिंगे व मंदा तोफा, वेध, मारदा, गडचिरोली


फोटो : मोहन हिराबाई हिरालाल, नितीन बारसिंगे, लता प्रतिभा मधुकर


मुखपृष्ठ व अंतर्गत मांडणी: अशोक निर्गुळकर:९८८१२३१८६५

सौजन्य : मारदा व मेंढा (लेखा) गावातील ग्रामस्थ

प्रकाशन : आदिवासी संसाधन केंद्र, एनकॅस, पुणे
एप्रिल २०१०

संपर्क : नॅशनल सेंटर फॉर ॲडवोकसी स्टडीज
'एनकॅस', सेरेनिटी कॉम्प्लेक्स, रामनगर कॉलनी,
बावधन रोड, पाषाण, पुणे २१.
फोन : ०२० २२९५२००३ / ०२० २२९५२००४
www.ncasindia.org





# कहाणी यशस्वी सामूहिक वनहक्क दाव्यांची

## मेंढा (लेखा) व मारदा गावांची

लता प्रतिमा मधुकर

नॅशनल सेंटर फॉर ॲडवोकसी स्टडीज

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | ३ |
| गावांची कहाणी | ५ |
| शासन यंत्रणेसोबत वनहक्क कायदा राबवून घेण्यासाठी जन–वकालत | ११ |
| आदिवासी मंत्रालयाची जबाबदारी | १३ |
| 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थे'कडून (टी.आर.टी.आय.) अपेक्षा | १६ |
| संस्था, संघटनांनी काय करावे | १७ |
| आता समोर वनव्यवस्थापनाचे नवे आव्हान | १९ |
| प्रक्रिया वनहक्क दावे प्रस्थापित करण्याची :कायद्याची लढाई कागदानेच | २१ |
| मारदा गाव वनहक्क दाव्यांची प्रक्रिया: दस्तऐवज | ३३ |
| वनहक्क कायदा व त्यामधील सामूहिक हक्क दाव्यासंदर्भातील माहिती | ६० |
| सामूहिक हक्कासाठीच्या दाव्याचा नमुना | ६९ |
| सामूहिक वनहक्कांचे हक्क जोडपत्र | ७० |
| भूमी अभिलेख नमुना | ७१ |

# प्रस्तावना

विषमतेवर आधारित व्यवस्थेचा एक भक्कम आधार व्यक्तिगत मालकीची (पर्सनल प्रॉपर्टीची) संकल्पना व तिचा जनमानसाने केलेला स्वीकार हा आहे. हा विचार अनेक विचारधारांतून आता मान्यता पावला आहे. राष्ट्र राज्याची (नेशन स्टेटची) मालकी हा व्यक्तिगत मालकीला पर्याय होऊ शकत नाही हे सुद्धा अनुभवातून आता स्पष्ट झाले आहे.

नैसर्गिक संसाधने ही उत्पादनाची प्राथमिक साधने म्हणून गाव किंवा मोहल्ला समाजाच्या मालकीची असावीत व ज्या कुणाला ती जगण्यासाठी आवश्यक असतील त्यांना सामाजिक, लिंग, धर्म, जात, वर्ण, भाषा इत्यादी आधारावर भेदभाव न करता समता व न्याय आधारे प्राथमिकतेने हक्क म्हणून मिळतील अशी व्यवस्था असावी हे सुद्धा आता वैचारिक पातळीवर सर्व मानवी परिवर्तनवादी मानतात, पण त्याच वेळेला शेतजमीन या महत्त्वाच्या उत्पादन साधनाच्या संदर्भात उपलब्ध झालेल्या ''ग्रामदानाचा विचार'' व ''महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम १९६४'' कडे सोईस्कररीत्या दुर्लक्ष सुद्धा करतात हे विदारक वास्तव आहे.

वनजमीन हे जगण्याचा आधार असलेले दुसरे महत्त्वाचे नैसर्गिक संसाधन. सरकारी वनविभागाकडेच त्याचे व्यवस्थापन व नियंत्रण संपूर्णपणे सोपविण्यात मोठी चूक झाली आहे, गाव समाजाचाच त्यावर स्वामित्व अधिकार व नियंत्रण असेल अशी व्यवस्था असावी असेही बोलले जात होते. प्रत्यक्षात मात्र वनजमिनीवर अनेक वर्षापासून जगण्यासाठी शेती करणाऱ्यांना व्यक्तिगत मालकी हक्काचे पट्टे मिळावेत या मागणीचाच मोठा राजकीय दबाव होता.

''अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वननिवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम २००६'' संसदेने मंजूर केला. 'भारत का राजपत्र' मध्येही ३१ डिसेंबर, २००७ रोजी हा कायदा छापून लागू करण्यात आला. त्याच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की ''इंग्रजी वसाहतीच्या काळात किंवा त्यानंतर स्वतंत्र भारतातही वनबंदोबस्त करत असताना अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासींचे त्यांच्या परंपरागत जमिनी व वास्तव्य असलेल्या भूप्रदेशावरील वनहक्क यांना योग्य प्रकारे मान्यता देण्यात आली नव्हती. वन परिसंस्थेचे जिवंत राहाणे व टिकून राहाणे ज्या अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी यांच्यासोबत अविभाज्यपणे जोडले गेले आहेत त्यांच्यावर त्यामुळे ऐतिहासिक अन्याय झाला आहे.'

अनुसूचित जमाती (आदिवासी) व इतर परंपरागत वननिवासी यांची वसाहतपूर्व व वसाहत प्रारंभ काळात जी परंपरागत व्यवस्था होती, ती सामूहिक हक्काचीच व्यवस्था होती, व्यक्तिगत मालकीच्या पट्ट्यांची व्यवस्था नव्हती. कायद्याच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे वनहक्कासंदर्भात झालेला ऐतिहासिक अन्याय दूर करण्याकरता या कायद्यात प्रामुख्याने सामूहिक वनहक्कांना मान्यता देण्यासंबंधी तरतुदी केलेल्या आहेत. व्यक्तिगत मालकी हक्काला मान्यतेची तरतूदही असली तरी तिचे स्थान कायद्याच्या रचनेत दुय्यमच दिसते.

अंमलबजावणीमध्ये मात्र उलटेच झाले. सर्व जण व्यक्तिगत हक्कांच्या मान्यतेकरता तुटून पडले व सामूहिक वनहक्काची महत्त्वपूर्ण बाब दुर्लक्षित व अवांछनीयच राहिली.

या पार्श्वभूमीवर गडचिरोलीसारख्या दुर्गम व अनेक समस्यांनी ग्रस्त असलेल्या मेंढा (लेखा) व मारदा या दोन पराक्रमी आदिवासी गावांनी कायदेशीर सामूहिक वनहक्क मिळवून घेण्याकरता दिलेला लढा निश्चितच ऐतिहासिक म्हणावा असाच आहे. महाराष्ट्रातच पण मुंबईच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या या गावांना सामूहिक वनहक्क मान्य झाल्याची १५ ऑगस्ट २००९ या स्वातंत्र्यदिनी झालेली घोषणा संपूर्ण जगात पोहचवण्यात लता प्र. म. व एनकॅस ने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. या गाव समाजांना सामूहिक वनहक्काचा अभिलेख मिळायला मात्र १५ डिसेंबर २००९ उजाडावा लागला. सामूहिक वनहक्कांना कायदेशीर मान्यता मिळवून घेऊन ऐतिहासिक अन्याय दूर करण्याचा पराक्रम करणाऱ्या या गावांची कहाणी या पुस्तिकेद्वारे सर्वांपुढे मांडण्याचे अभिनंदनीय कार्य एनकॅस ने केले आहे. सामूहिक वनहक्क मिळवून घेण्याची कायद्याने मिळालेली संधी व ते मिळवून घेता येतात अशी खात्री सर्व संबंधितांना कळून ते त्यांना प्राप्त होवोत हीच हार्दिक सदिच्छा !

**मोहन हिराबाई हिरालाल**

भारतातील अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वननिवासी यांनी वन अधिकार मान्यता अधिनियम १८ डिसेंबर २००६ रोजी संसदेमध्ये पारित झाल्यावर खूप आनंद व्यक्त केला. पण २०१० साल उजाडले तरी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी फारच कमी ठिकाणी झालेली दिसून येत आहे. या कायद्याला पारित करताना आदिवासींवर या देशात ऐतिहासिक अन्याय झाला, असे शासनाने म्हटले असले तरी त्याच्या अंमलबजावणीमध्ये अनेक अडथळे आणून केलेली दिरंगाई हा सुद्धा एक प्रकारचा अन्यायच आहे, असे अदिवासी संघटनांचे नेते म्हणत आहेत. उत्तराखंड येथील राष्ट्रीय वन श्रमजीवी मंचाचे नेते श्री. मुन्नीलाल म्हणतात, ''हा कायदा म्हणजे आमच्यासाठी दुसरी आझादी आहे, पण ही आझादी अनुभवण्याकरता आमच्या जंगलावरच्या मालकी हक्कांना मान्यता देण्याची शासनाची अजूनही मानसिक तयारी झालेली नाही.'' तर 'सन्मानाने जगण्यासाठीच्या अभियानाचे' नेतृत्त्व करणाऱ्या व कायदा आणण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या श्री. प्रदीप प्रभू यांच्या मते ''कायदा करण्यासाठी जसा संघर्ष करावा लागला तसा त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अनेक ठिकाणी करावा लागत आहे.'' सामूहिक वनहक्क दाव्यांबाबत सरकारची उदासीनता आणि एकाच वेळी दावे करण्यासाठीची लादलेली अंतिम तारीख हा खेळ लोकांच्या उपजीविकेशी खेळला जात आहे. जिथे संघटन नाही तिथे लोकांना कायद्याद्वारे मिळालेल्या वनहक्क मान्यतेसंदर्भात आकलन होण्यासाठी पुरेसा अवधी देण्यात आलेला नाही, अशीही खंत अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर ज्या गावांनी कायदा समजून घेऊन कागदाचे दडपण न मानता, सामूहिक वनहक्कांना मान्यता मिळवून घेतली त्या गावांची ही कहाणी...




महाराष्ट्रातील मागास जिल्हा म्हणवल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील मेंढा (लेखा) व मारदा या दोन आदिवासी गावांनी स्वत: दाखल केलेले सामूहिक वनहक्क दावे जिल्हाधिकारी श्री. अतुल पाटणे आणि पालकमंत्री श्री. रमेश बंग यांनी दि. १५ ऑगस्ट, २००९ रोजी मंजूर केले. दि. १५ डिसेंबर, २००९ रोजी राज्यपाल श्री. जमीर यांनी मेंढा (लेखा) व मारदा गावातील प्रतिनिधींच्या हाती प्रत्यक्ष 'भूमी अभिलेख' सुपूर्द करुन गावाच्या वनभूमीवर असलेल्या गावाच्या सामूहिक हक्कावर शिक्कामोर्तब केले. या गावांमधील लोकांनी वनहक्क समितीकडे अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम, २००८ अंतर्गत सामूहिक वनहक्काचे दावे दाखल केले होते. या दाव्यांतर्गत मेंढा (लेखा) गावातील लोकांना ४५२८.८२ एकर वन जमिनीवर तसेच मारदा गावातील लोकांना २२७८.८२ एकर वनजमिनीवर कायदेशीर 'सामूहिक वनहक्क' प्राप्त झाला आहे. अशा प्रकारची संपूर्ण देशातील व महाराष्ट्र राज्यातील ही पहिली घटना असून इतर आदिवासी व अन्य परंपरागत वननिवासींसाठी एक मार्गदर्शक पाऊलवाट या गावांनी तयार केली आहे.

दीडशे वर्षांपासून देशभरात वनहक्कांसाठी झालेल्या आदिवासींच्या चळवळी व जनआंदोलनांच्या अथक प्रयत्नांतून अखेर २००६ मध्ये दि. १८ डिसेंबर रोजी संसदेत अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ हा कायदा मंजूर झाला. २९ डिसेंबर २००६ रोजी मा. राष्ट्रपतींची स्वाक्षरी होऊन ३१ डिसेंबर २००७ रोजी अंमलात आला. या संबंधीचे नियम १ जानेवारी २००८ रोजी प्रसिद्ध झाले. आदिवासी व अन्य परंपरागत वननिवासी यांच्यावर 'ऐतिहासिक अन्याय झाल्याची कबुली' देत सरकारने हा कायदा लागू केला, ही एक अभूतपूर्व घटना होय. कारण  पहिल्यांदाच जंगलातील मूळ रहिवासी असे आदिवासी व ज्यांची उपजीविका जंगलावरच अवलंबून आहे असे अन्य परंपरागत वननिवासी यांना 'अतिक्रमक' म्हणून नाही तर वनातील कायदेशीर नागरिक म्हणून आता या कायद्यामुळे ओळखले जाईल. पण या कायद्याने दिलेले हक्क मिळवण्यासाठी आपल्या वापरातील जंगल जमिनीवर दावा करण्यासाठी या कायद्यांतर्गत दिलेल्या प्रक्रियेतून दावेदाराला जावे लागणार आहे. त्यासाठी दावेदारांनी ही प्रक्रिया समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

मेंढा (लेखा) व मारदा गावांनी या कायद्याचा सविस्तर अभ्यास केला. त्यातून त्यांच्या लक्षात आले की संपूर्ण गाव ज्या वनभूमीचा वापर पिढ्या न् पिढ्या करत आहे, त्या वनभूमीवर सर्वप्रथम सामूहिक हक्काचा दावा करणे गरजेचे आहे. एकीकडे वैयक्तिक दावे करुन एका व्यक्तीचा वनजमिनीवर हक्क प्रस्थापित करण्यासाठी चाललेल्या जोरदार मोहिमेच्या पार्श्वभूमीवर सामूहिक वनहक्क दावा करणारी ही दोन गावे विशेष लक्ष वेधून घेतात.

**मेंढा (लेखा) व मारदा गावांची पार्श्वभूमी :**

गडचिरोली हा आदिवासी व वनबहुल जिल्हा आहे. इथे एकूण जमिनीपैकी ८० टक्के जमिनीवर जंगल असून, खनिज संपत्तीने हा जिल्हा समृद्ध आहे. तरी सुद्धा या जिल्ह्यातील ८४ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत. या जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेची स्थिती गंभीर आहे. एकीकडे नक्षलवादी चळवळीचा गड मानला जाणाऱ्या या जिल्ह्यात शांतीमय व अहिंसक पद्धतीने काही जन संघटना, संस्था व स्थानिक आदिवासी लोक कार्य करत आहेत.

मेंढा (लेखा) गाव हे या संस्था–संघटना व कार्यकर्त्यांसाठीसुद्धा प्रेरणादायी गाव आहे. या गावाजवळ १९७०–८०च्या दशकात गडचिरोली जिल्हा व त्यालगतच्या परिसरात सरकारने इन्द्रावती व इचमपल्लीजवळ गोदावरीनदीवर दोन मोठ्या धरणांसह, १४ मध्यम धरणे बांधण्याचा प्रस्ताव पारित केला होता. या धरणांमुळे सुमारे १ लाख लोक विस्थापित होणार होते. तसेच जंगलाचा १/३ भाग पाण्याखाली जाऊन येथील जैवविविधतेने समृद्ध जंगलाचा नाश होणार होता. त्यावेळी या प्रस्तावाला आदिवासी नेते राजे लाल शाम शाहा

यांच्या नेतृत्त्वाखाली 'जंगल बचाओ, मानव बचाओ' या आंदोलनाच्या स्वरुपात कडाडून विरोध झाला. या आंदोलनात प्रसिद्ध समाजसेवक बाबा आमटे व चिपको आंदोलनाचे प्रणेते श्री. सुंदरलाल बहुगुणा सहभागी झाले होते. मेंढा (लेखा) गावातील देवाजी तोफासुद्धा या आंदोलनात इतर ग्रामस्थांसोबत सामील झाले होते. या संघर्षानंतर सरकारला धरणांचा प्रस्ताव मागे घ्यावा लागला. आदिवासींच्या एकतेचा विजय झाला. त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि स्वशासनाच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरु झाली. मेंढा गावात आंदोलनाचा पाठपुरावा म्हणून सक्रीय कार्यकर्त्यांच्या सहयोग बैठका सुरु झाल्या. गावात एका सर्वोदयी घोषणेवर चर्चा झाली व गावातील लोकांना ती पटली. ती घोषणा होती, 'आमच्या गावात आमचे सरकार'.

ही घोषणा देणे सोपे परंतु, ती निभावणे कठीण. गावकऱ्यांनी मात्र घोषणेपुरती घोषणा दिली नव्हती. अत्यंत गांभीर्याने आमच्या गावात आम्हीच सरकार' ही घोषणा समजून घेतली. याचा अर्थ आपली ग्रामसभा सशक्त असणे गरजेचे आहे, हे त्यांनी जाणले. सर्वसहमतीच्या निर्णय प्रक्रियेवर त्यांनी भर दिला. गावातील प्रत्येक स्त्री–पुरुषाची (१८ वर्षे पूर्ण असलेली प्रत्येक व्यक्ती) सहमती असल्याशिवाय कुठलाही निर्णय होणार नाही, हे त्यांनी निश्चित केले. आजही गावातील ग्रामसभेत सर्वसहमतीनेच निर्णय घेतले जातात. सोबतच स्त्रियांच्या सहभागाशिवाय एकही ग्रामसभा होणार नाही हा एक महत्त्वाचा निर्णय गावाने घेतला.

सामाजिक कार्यकर्ते श्री. मोहन हिराबाई हिरालाल १९७६ च्या सुमारास अशा प्रकारच्या गावाचा शोध घेत होते. आदिवासी भागातच काम करायचे त्यांनी ठरवले होते. तेव्हा ते देवाजी तोफांना भेटले आणि लेखा गावाजवळ असलेल्या मेंढा गावाचा (म्हणून मेंढा (लेखा)) त्यांनी परिचय करुन घेतला. त्यांनी केलेल्या या गावाच्या अभ्यासातून व त्यावर लिहिलेल्या लेखांमुळे इतर अभ्यासकांनाही या गावाचे आकर्षण वाटू लागले. त्यामुळे अनेक शास्त्रज्ञ, पर्यावरणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, विचारवंत, पत्रकार यांचा ओघ गावाकडे सुरु झाला. मेंढा (लेखा) गावाने स्वशासनाकडे केलेली वाटचाल आणि नैसर्गिक संसाधनांच्या शाश्वत व्यवस्थापनाबाबत केलेल्या प्रयोगांमुळे जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी शास्त्रज्ञांनी या गावाची निवड केली. १५ एप्रिल २००४ रोजी लागू झालेल्या जैवविविधता कायदा, (२००२) च्या नियमांच्या आधारावर जैवविविधता नोंद दस्तऐवज तयार करायचे ठरवण्यात आले. बंगलोरच्या 'भारतीय विज्ञान संस्थान'मधील 'परिसर विज्ञान केंद्रा'ने अशा दस्तऐवजांसाठी महाराष्ट्र व कर्नाटकात अभ्यास केले. जैवविविधता नोंद दस्तऐवजाला 'पी.बी.आर.' (Peoples Bioliversity Register) असे संबोधले जाते. ग्रामीण भागात 'पी.बी.आर.' हाच शब्द प्रचलित आहे. मेंढा (लेखा) गावाचे पी.बी.आर. हे डॉ. माधव गाडगीळ, नीलेश हेडा, योगेश गोखले, मोहन हिराबाई हिरालाल, देवाजी नवलू तोफा, डॉ. विजय एदलाबादकर व इतर अनेक कार्यकर्त्यांच्या व गावातील रहिवाश्यांच्या मदतीने तयार करण्यात आले.



मेंढा (लेखा) गावाप्रमाणेच आपल्या गावानेही स्वशासनाची वाट धरावी असे मारदा गावाला वाटले. मारदा खरे तर मेंढ्यापासून बरेच दूर आहे. संपूर्ण जंगलाने वेढलेले हे गाव. गावाने संयुक्त वनव्यवस्थापनातून निर्माण केलेले वनतलाव, त्यातील पांढरी, गुलाबी कमळे, अतिशय कडक उन्हाळ्यातही दाट वनांमुळे असणारा गारवा यामुळे गाव मनात ठसते. मेंढ्याच्या पावलावर पाऊल ठेवून गावाचा पी.बी.आर. करण्यासाठी गावकऱ्यांनी सुरु केलेला अभ्यास हे मारदा गावाचे वैशिष्ट्य आहे. त्यासाठी त्यांना वेध संस्थेचे नितीन बारसिंगे,मंदा तोफा आणि ज्ञान प्रबोधिनीचे सुबोध कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

एकेकाळी कोणत्याही सर्वसाधारण गावासारखेच होते मेंढा गाव. तिथेही दारु गाळणे, दारूचे व्यसन, जंगलतोड, संसाधनांचा वारेमाप उपभोग, महिलांना दुय्यम वागणूक, दारू पिऊन महिलांना मारहाण अशा अनेक वाईट गोष्टी होत्या. पण स्वत:च्या गावाला, परंपरांना, चालीरीतींना, माणसाच्या मनोवृत्तीला समजून घेत गावाने सामान्यत्वाकडून असामान्यतेकडे वाटचाल सुरू केली आहे. गडचिरोलीतील काही गावे आपल्या गावातसुद्धा असे बदल करु बघत आहेत. ‘सामूहिक वनहक्काचा दावा’ प्राप्त केलेले मारदा गाव त्यापैकीच एक आहे.

**अभ्यासाच्या मुळाशी जिज्ञासा :**

‘आपणच आपला मार्ग शोधू या’ या दृष्टिकोनातूनच महाराष्ट्रात ७० च्या दशकात परिवर्तनवादी चळवळीने लोकांनीच स्वत:चे प्रश्न स्वत: सोडवावे याकरता स्वत:च्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी लोक जागृती केली. मोहन हिराबाई हिरालाल यांनी मेंढा (लेखा) गावाच्या प्रेरणेतून ‘शोध’ अभ्यास गटाच्या स्थापनेत पुढाकार घेतला. मेंढा (लेखा) गावाची अभ्यासाची पद्धत आपल्या शैक्षणिक पद्धतीपेक्षा फार वेगळी आहे. प्रत्येक विषय जो गावाशी संबंधित आहे, त्याच्या मुळाशी जाण्याची जिज्ञासा या अभ्यासामागे आहे. म्हणूनच ज्यावेळी वन अधिकार कायदा २००६ अस्तित्वात आला, तो हातात पडल्यावर गावातील लोकांनी तो समजून घेतला.

कायदा कसा तयार झाला? कायद्याचे नियम कसे तयार झाले? त्यात काय त्रुटी आहेत? यावर एकीकडे संपूर्ण देशभरात व महाराष्ट्रात आदिवासी व वनहक्काच्या प्रश्नावर काम करणारे कार्यकर्ते व अभ्यासक बोलत होते. चिंतन करत होते. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (टी.आर.टी.आय.) यांनी इंग्रजीतील

कायद्याच्या मसुद्याचे शोषित जन आंदोलन समितीने केलेले मराठी भाषांतर स्वीकारले. परिषदा घेतल्या. वेबसाईटवरुन हा कायदा महाराष्ट्रातील (कॉम्प्युटर व इंटरनेट उपलब्ध असणाऱ्यांसाठी फक्त) प्रकाशित केला. तसेच पुस्तिकासुद्धा प्रकाशित केल्या. त्या मसुद्याला धरुन राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केंद्र व महाराष्ट्रातील संबंधित सामाजिक कार्यकर्ते यांनी टी.आर.टी.आय. सोबत एक कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत वनहक्क कायदा आणण्यासाठी ज्यांनी आंदोलने केली, मसुदा ठरवला, मसुद्यात काय बदल होतील, नियम कोणते व कसे येतील यासाठी सतत प्रयत्न केले, त्या प्रदीप प्रभू, डॉ. माधव गाडगीळ, इ. तज्ज्ञ मंडळींसह कायद्याचा सखोल अभ्यास केलेली मंडळी उपस्थित होती. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी टी.आर.टी.आय. ने त्वरित दाव्याचे फॉर्म्स द्यावेत, ते कसे भरले जावेत, दावे दाखल करण्यासाठी प्रक्रिया सर्व अनुसूचित जमाती व परंपरागत वननिवासींना समजावून सांगितली जावी यासाठी काय करावे या सूचना तज्ज्ञ मंडळींतर्फे देण्यात आल्या.

नंतर असे लक्षात आले की कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात ज्या कार्यशाळा घेण्यात आल्या, जिल्हापातळीवर वनहक्क समितीचे सचिव बोलवून त्यांना जे प्रशिक्षण देण्यात आले, त्यात त्यांना जास्तीत जास्त वैयक्तिक दावे कसे भरावयाचे याचेच प्रशिक्षण देण्यात आले. परंतु सामूहिक दाव्यांसंदर्भात मात्र अपूर्ण माहिती दिली गेली. त्यामुळे महाराष्ट्रात वैयक्तिक वनहक्क दावे दाखल करण्यासाठी जितक्या प्रमाणात लोक पुढे आले, तसे ते सामूहिक वनहक्क दावे करण्यासाठी आले नाहीत.



या पार्श्वभूमीवर मेंढा (लेखा) व मारदा गावाने स्वत: सामूहिक वनहक्क दाव्यांकडे लक्ष केंद्रित केले हे विशेष आहे. शासनातील अधिकारीसुद्धा सामूहिक दावे म्हणजे फक्त 'सार्वजनिक सोयी सुविधांसाठीच्या सार्वजनिक जमिनीचे दावे' असे सांगून दिशाभूल करत आहेत असे अभ्यास करताना मेंढा (लेखा) गावातील ग्रामस्थांच्या लक्षात आले.

- त्यांनी मग संपूर्ण कायदा वाचून काढला.

- त्यानंतर कायद्यासंदर्भात प्रक्रिया कशी करायला हवी ते समजून घेतले.

- गावातील सर्वच लोक शिक्षित नाहीत. काहीजण निरक्षर आहेत. पण त्यातील शिकलेल्यांनी वाचायचे. अभ्यास गटाने ते शब्द न् शब्द ऐकायचे, समजले नसेल तर प्रश्न विचारायचे. त्यांनी कागद आणि कायदा या दोन्हीच्या बडग्याची भीती बाळगली नाही. आपल्यासाठी कायदा असेल तर तो कठीण शब्दात कशाला हवा ?

सोप्या शब्दात समजेल असा हवा. मग जे शब्द अडले असतील ते त्यांनी मोहन, सुबोध, नितीन, मंदा अशा सुशिक्षित व कायद्याच्या अभ्यासकांकडून समजून घेतले.

हा अभ्यास करताना त्यांच्या लक्षात आले की सामूहिक दावा केला तर गावाच्या हद्दीतले संपूर्ण जंगल, ज्यावर आपला निस्तार हक्क आहे, ज्यातून आपण गौण वनोपज गोळा करतो अशा जंगलावर आपला हक्क प्रस्थापित होईल. म्हणून आपण सामूहिक दावाच करायला हवा असे त्यांनी सर्वसहमतीने ठरवले. या कायद्याने आपल्यावर आजवर सरकारने लावलेला अतिक्रमणदार किंवा चोर हा शिक्का पूर्णपणे पुसला जाणार आहे, हे अभ्यास करताना गावकऱ्यांच्या मनात पूर्ण ठसले. पिढ्यानुपिढ्या जे जंगल आई म्हणून मानले, जिच्या रक्तावर पोसले गेलो, तिथे आता कुणी चोर ठरणार नाही, हक्काने तिथे जाता येईल, तसेच हक्क प्रस्थापित झाला की ते जंगल सांभाळण्याची, संरक्षण करण्याची, वाढवण्याची, संवर्धन करण्याची जबाबदारी आपली आहे; कायद्याने जंगलाच्या व्यवस्थापनाचीही जबाबदारी आपल्यावर सोपवली आहे, हे गावकऱ्यांच्या लक्षात आले.

अभ्यास करताना अजून एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली ती म्हणजे सामूहिक दावा केला की गाव आजवर वापरत असलेली जमीन व संसाधने आपल्या हक्काची आहेत हे प्रस्थापित होईल. कायद्यात नमूद केलेल्या गोष्टींसाठी गावातील अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वननिवासी ज्या जंगलात जातात ते जंगल, तळे, नदी व इतर गौण वनोपज सगळे गावाचे स्वत:च्या हक्काचे आहे, यावर शिक्कामोर्तब होईल. समाज म्हणजे सर्व व्यक्तींचा समुदाय, जेव्हा समुदायाचा सामाजिक हक्क प्रस्थापित होतो, तेव्हा व्यक्तींचा हक्क त्यात अंतर्भूत असतो, म्हणून सामूहिक दाव्यांना प्राथमिकता देऊन ते करावेत, सोबतच व्यक्तिगत दाव्यांची प्रक्रिया समांतरपणे सुरूच राहील. ते दावे लावणे व त्यांचे दावे प्रस्थापित झाल्यावरही उरलेली सर्व जमीन गावाच्या हक्काची असेल. म्हणून सामूहिक वनहक्क दावेच दाखल करायला हवेत, हे त्यांनी जाणले.

हा सर्व अभ्यास झाल्यावर आणि समाज विकसित झाल्यावर गावातील ग्रामस्थांनी कायद्यात काय काय पुरावे मागितले आहेत, गावातील हद्दीचा नकाशा कसा तयार करायचा इ. सर्व गोष्टींचे तपशील गोळा केले. जसा नमुना दिला आहे, त्यातील एकही शब्द इकडे तिकडे न करता मोहन हिराबाई हिरालाल व सुबोध कुलकर्णी या तज्ज्ञांच्या मदतीने हा दाव्यांचा फॉर्म भरला. तो नीट भरला गेला आहे ना, कुठे अडवले जाणार नाही ना, याची खात्री पुनश्च करुन घेतली. दाव्याचा भरलेला फॉर्म सर्व ग्रामस्थांसमोर वाचला.



# शासन यंत्रणेसोबत वनहक्क कायदा राबवून घेण्यासाठी जन–वकालत

एकीकडे गावकरी अभ्यास करत होते. दुसरीकडे त्यांना सहकार्य करणारे मोहन, सुबोध, नितीन, मंदासारखे कार्यकर्ते व अभ्यासक समांतरपणे शासकीय अधिकाऱ्यांशीही संपर्क ठेवून होते. कधी संवाद साधणे सोपे होते, तर कधी संघर्ष करावा लागत होता. कायदा आला, त्या सुमारास २००६ मध्ये श्री. निरंजनकुमार सुधांशु गडचिरोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते. मोहन व सुबोध त्यांना जाऊन भेटले. नियम ६ प्रमाणे कायद्याच्या कलम १२(४) मध्ये अशी तरतूद आहे की आणखी अभिलेख हवे असतील व वनहक्क समितीने मागणी केली तर ते पुरवायलाच हवेत. ''या कलमानुसार सर्वच वनहक्क समित्यांना त्या त्या गावाचे अभिलेख लागतील, मग तुम्हीच ते स्वत:हून का पुरवत नाही'' असे या कार्यकर्त्यांनी विचारल्यावर शासनाने ठरवले की आपण ते द्यायला हवेत. तसेच नियम ६ अनुसारच जिल्हाधिकाऱ्यांनी तसेच उपविभागीय समितीने वनहक्क समितीला महसूल नकाशा, वननकाशा व मतदार यादी देणे आवश्यक आहे, हे कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पटवून दिले. अहेरीचे उपविभागीय अधिकारी श्री. दामोदर नाने यांना तशा सूचना दिल्या. स्वत: दामोदर नाने एक उत्साही अधिकारी असल्याने त्यांनी प्रत्येक वनहक्क समितीकडे पाठवण्यासाठी एक संपूर्ण 'किट' तयार केले. त्या किटमध्ये त्यांनी प्रत्येक गावाचा वननकाशा, महसूल नकाशा व निस्तार पत्रकाच्या प्रतिलिपी दिल्या. जमिनीचे मोजमाप करण्यासाठी एक मोठी टेप, कागद, स्टॅम्पपॅड, प्रत्येक गावाच्या वनहक्क समितीचा स्वतंत्र स्टॅम्प, स्टेपलर इ. सामुग्रीसुद्धा दिली. कार्यकर्त्यांनी केलेल्या या जनवकालतीला यश आले आणि वनहक्क समितीला गावासंदर्भात लागणारे नकाशांचे तपशील शासनानेच प्रत्येक ठिकाणी उपलब्ध करुन दिले.

ही सर्व प्रक्रिया निरंजनकुमारांच्या काळात व्यवस्थित पार पडली असली तरी वनहक्क समित्यांकडे दावे दाखल होणे आणि ते उपखंडस्तरीय समितीकडे येणे या प्रक्रियेने वेग धरला नव्हता. श्री. अतुल पाटणे, जिल्हाधिकारी म्हणून २००८ च्या उत्तरार्धात रुजू झाले आणि सगळ्या यंत्रणेच्या मागे लागून वैयक्तिक दावे करुन घेण्याची त्यांनी जोरदार मोहीम काढली. ३५००० व्यक्तिगत दावे दाखल करुन घेणारा गडचिरोली जिल्हा महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत खूपच पुढे आहे. परंतु अतुल पाटणेंकडून सामूहिक हक्काच्या दाव्यांकडे सुरुवातीला दुर्लक्षच झाले. त्यावेळी माहितीच्या अधिकाराचा वापर करुन किती सामूहिक हक्कांचे दावे झाले आहेत, ही माहिती कार्यकर्त्यांनी काढली. जिल्हाधिकारी म्हणून अतुल पाटणेंनी मग एक मिटिंग बोलावली आणि मोहन हिराबाई हिरालाल व सुबोध कुलकर्णी यांना कायद्याबद्दलचे विशेष जाणकार म्हणून जिल्हा सल्लागार समितीवर नेमले. १४ ऑगस्ट २००९ रोजीच्या मिटिंगमध्ये या सल्लागार समितीने मेंढा (लेखा) व मारदा या दोन गावांनी संपूर्ण तपशील, पुराव्यासह वनहक्क समितीकडे दावे केले असून ते उपखंडस्तरीय समितीकडून जिल्हा समितीकडे पाठवण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले. गडचिरोली जिल्हा जसा व्यक्तिगत दाव्यांच्या बाबतीत अग्रक्रमावर आहे, तसेच हा जिल्हा सामूहिक दावे मान्य करणारा भारतातील पहिला जिल्हा असू शकतो, असेही जिल्हाधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिले. १४ ऑगस्टच्या रात्री

जिल्हाधिकाऱ्यांनी दावे नजरेखालून घातले आणि १५ ऑगस्ट २००९ रोजी मेंढा व मारदा दोन्ही गावांचे सामूहिक वनहक्क दावे मंजूर झाल्याचे जाहीर केले. तत्कालीन पालकमंत्री रमेश बंगसुद्धा या कार्यक्रमास हजर होते.

एवढे सगळे होऊनही आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने संपूर्ण राज्यात सामूहिक दावे दाखल करुन घेण्यासाठी व्यवस्थित मोहीम राबवलेली दिसत नाही. अनेक जिल्ह्यांमध्ये असे अभ्यास गट व संघटना नाहीत. त्यामुळे हे काम शासकीय व प्रशासकीय पातळीवरच व्हायला हवे आहे. याबाबत सुबोध कुलकर्णी व मोहन हिराबाई हिरालाल यांनी नोंदवलेली पुढील निरीक्षणे खूप महत्त्वाची आहेत.

**शासनाने पुढाकार घेऊन करायच्या गोष्टी**

हा कायदाच मुळात आदिवासी व अन्य परंपरागत वन निवासी यांच्यावर झालेला ऐतिहासिक अन्याय दूर करण्यासाठी केला आहे, हे शासनाने प्रस्तावनेतच नमूद केले आहे. तसेच सर्व रेकॉर्ड, नकाशे व कागदपत्रे सरकारकडेच अस्तित्त्वात आहेत. शासनाने हे लक्षात घ्यायला हवे की आदिवासी व अन्य परंपरागत वननिवासींना शिक्षणापासून वंचित ठेवल्याने कागदपत्रे हाताळण्याची किंवा मोठ–मोठे फॉर्म भरण्याची भीती वाटते. या निरक्षरांकडून दाव्याचे फॉर्म भरुन घेणे, हा सरकारकडून अन्यायच होईल. त्यापेक्षा प्रक्रिया अशी हवी की, जिल्हाधिकारी व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी सामूहिक हक्कांचे रीतसर दावे नमुन्याप्रमाणे तयार करुन व त्याची पडताळणी करुन ते ग्रामसभेकडे पाठवावेत. गावकऱ्यांना त्यांच्या गावाची हद्द, तेथील संसाधने, ते वापर करत असलेली भूमी, वन व गौण वनउपज इत्यादी संदर्भात सविस्तर माहिती असते. ग्रामसभेने आपला अधिकार वापरुन सर्व दाव्यांमध्ये सरकारने दिलेली माहिती ठीक असल्याची खात्री करावी. त्रुटी राहिल्यास दुरुस्त कराव्यात किंवा दुरुस्तीसाठी अधिकाऱ्यांकडे पाठवाव्यात. ग्रामसभेत सर्वांचे समाधान झाल्यावरच ग्रामसभेने दावे मंजूर करावेत. ग्रामसभेला दावा मंजूर करण्याचा हक्क या प्रमाणे राबवला जाईल व ग्रामस्थांवर दावे भरण्याचे व कागदपत्रे सादर करण्याचे ओझे राहाणार नाही.

# आदिवासी मंत्रालयाची जबाबदारी

वनहक्क समित्यांना एकूण कार्यवाही समजावी म्हणून क्षमता–विकासासाठी भरपूर पैसा आदिवासी मंत्रालयाकडे आला आहे. तसेच उपविभागीय समितीवर अधिकारी, समन्वयक, संगणकतज्ज्ञ नेमण्यासाठीसुद्धा पैसा आला. जिल्हा स्तरावर समन्वय कक्ष काढून त्या कक्षात ज्यांना महसूल विभागातील प्रशासनाचा अनुभव आहे असे कर्मचारी नेमण्यासाठीसुद्धा निधी आला. परंतु कुठे कुठे असे समन्वय कक्ष निर्माण झाले? क्षमता विकास कार्यशाळा किती ठिकाणी झाल्या? समन्वयक, संगणकतज्ज्ञ व अधिकारी उपविभागीय समितीवर नेमले गेले का? किती उपविभागीय समित्यांवर ते नेमले गेले? याची जिल्हावार यादी आदिवासी मंत्रालयाने, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने तपशीलवार देणे आवश्यक आहे. हा निधी कसा वापरला हे जाहीर करणे गरजेचे आहे.



पंतप्रधान कार्यालयाकडून आता यासंदर्भात आढावा घेणे सुरू झाले आहे. ४ डिसेंबर २००९ रोजी पंतप्रधानांसोबत वनहक्क कायद्यासंदर्भात परिषद झाली. पंतप्रधानांच्या फक्त भाषणाशिवाय परिषदेत घेतले गेलेले इतर निर्णय व परिषदेचा सविस्तर वृत्तांत अजूनही वेबसाईटवर प्रसिद्ध केला गेला नाही. खरेतर राजस्व आयोगाने तातडीने वनहक्कांच्या संदर्भातील परिस्थितीचा आढावा घ्यायला हवा. आदिवासी मंत्रालयाने आदिवासी विभागाची – उपखंडस्तरीय समितीच्या सचिवांची बैठक बोलवायला हवी. उपखंडस्तरीय समितीकडेच सर्व साहित्य पुरवण्याची जबाबदारी असताना अजूनही सगळीकडे वनहक्क समित्यांना गडचिरोलीप्रमाणे संपूर्ण 'किट' का पोहोचले नाही याचा जाब विचारायला हवा.

वनहक्क समितीकडे जे दावे येतात त्या दाव्यांची पडताळणी ग्रामसभेत केली जाते. आणि ते लगेच उपविभागीय समितीकडे दाखल केले जातात. खूपदा ते उपविभागीय समितीकडेच पडून राहतात. खरे तर जिल्हाधिकाऱ्यांकडे सगळी यंत्रणा उपलब्ध असल्याने जिल्हा समितीकडे उपविभागीय समितीने त्वरित दावे पाठवले तर तपासणी लगेच होऊ शकते. सोबत योग्य समन्वय राखून ही प्रक्रिया झाली तर आक्षेपाचे मुद्दे फारसे राहणार नाहीत.

उपखंडस्तरीय समितीकडे आल्यावर काय काय प्रक्रिया केली गेली, हे सुद्धा वेबसाईटवर टाकायला हवे.

**उपविभागीय समितीने करावयाची प्रक्रिया**

- पडताळणी अहवाल तयार करणे
- नोटशीट तयार करणे
- प्रत्येक नोटशीट भरली जाणे
(मान्य किंवा अमान्य लिहिणे किंवा काही बदल करायचे असल्यास सुचवणे)
- कार्यालयीन प्रक्रियेसाठी पुराव्यांची यादी जोडणे
- सर्व प्रक्रिया झाल्यावर जिल्हास्तरीय समितीकडे नोटशीट व पुराव्यासह दावा सादर करणे

कित्येक ठिकाणी दाव्यांच्या फाईल्स पडून आहेत. या संदर्भात माहितीच्या अधिकाराखाली कुणी फाईल मागितली तर ती दाखवायला हवी. फाईल पंधरा दिवसांच्या वर पडून राहिली असेल तर दफ्तर दिरंगाईचा कायदा लागू करुन जाब विचारावा लागेल. खरेतर शासनाला हे लगेच करता येणे शक्य आहे, कारण ही प्रक्रिया सुलभ व्हावी म्हणून आदिवासी मंत्रालयाकडे मोठ्या प्रमाणावर निधी देण्यात आला आहे.

वनहक्क दाव्यांसंदर्भात शासनाकडे लोकांच्या बाजूने प्रश्न मांडायला पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्यांची मदत होऊ शकते. पण अनेकदा ते मदत करत नाहीत असे दिसून येते. अशावेळी शासनाने स्थानिक संस्था–संघटनांच्या प्रतिनिधींना प्रतिनिधित्व देणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे गडचिरोलीमध्ये जिल्हा सल्लागार समितीवर संस्थांच्या प्रतिनिधींना घेण्यात आले, तसेच इतरत्रही करता येईल. दावे दाखल करुन घेताना, तसेच कायदा समजून घेण्यातही या तज्ज्ञांची/प्रतिनिधींची मदत होऊ शकते.

तलाठी, ग्रामसेवक व वनरक्षक हे तिघे कायम गावाच्या संपर्कात असल्याने दावा दाखल करण्यासाठी त्यांचा उपयोग होऊ शकतो. म्हणून त्यांचीच क्षमता बांधणी होणे गरजेचे आहे.

वनहक्क दाव्यांचा संबंध गावाशी, पर्यायाने गावाच्या ग्रामसभेशी आहे; पंचायतीच्या ग्रामसभेशी नाही, हे एकदा वरील तिघांनाही पटवून देणे गरजेचे आहे.

एकेका गावाची ग्रामसभा होऊन अतिशय कमी वेळात दावे मंजुरीचे काम पार पडू शकते.

सरकारी अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना खसरा नंबर, कंपार्टमेंट नंबर वगैरे मागायची गरजच नाही. कारण सरकारी रेकॉर्डप्रमाणे जे नंबर दिलेले आहे ते खसरा किंवा सर्वे किंवा कंपार्टमेंट नंबर असतात. म्हणून ते सरकारी कागदपत्रात उपलब्ध असतातच. सरकारी अधिकारी स्वत:च दावा पत्रात ते नोंदवू शकतात, त्यामुळे दाव्याची प्रक्रिया थांबवण्याची गरज नाही. जिथे गावाचे मोजमाप नाही असे म्हटले जाते, तिथे गावाची चतु:सीमा नोंदवावी. गावाच्या पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिणेला काय काय आहे, ते लिहावे. हे प्रत्येक गाव करु शकते. दावा करायला मोजमापाची गरज नाही. गावाने जी चतु:सीमा दाखवली आहे, ती प्रत्यक्ष येऊन बघणे, तिची मोजणी करणे हे सरकारचे काम आहे.

समजा दोन गावांमध्ये सीमेवरुन वाद असतील, तर दोन्ही गावांच्या वनहक्क समित्यांनी बसून निवाडा करावा. तसे केले नाही तर सगळे अधिकार उपखंड स्तरीय समिती (एस.डी.ओ.) कडे जातील. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ होईल, म्हणून आपापसात समझोता करावा. वनहक्क समित्यांची संयुक्त बैठक बोलावून चर्चा करावी, ठराव करावा. नजरी नकाशा तयार करावा व चतु:सीमा लिहाव्या. दोन्ही वनहक्क समित्यांनी सह्या कराव्या. हा निर्णय आपापसात दोन्ही वनहक्क समित्यांनी घेतल्यामुळे गावांचा वापर व ताबा निश्चित होईल. सरकारने सत्यापनाच्या वेळी तो मोजावा. वनहक्काचा दावा करण्यासाठी त्याचे मोजमाप गरजेचे नाही, हे पुनश्च समजून घ्यावे.



## 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थे'कडून (टी.आर.टी.आय.) अपेक्षा

कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभागावर टाकली आहे. कायद्याच्या संदर्भातील जागृती, माहिती, परिपत्रके, कार्यशाळा, परिषदा, अंमलबजावणीचे टप्पे, पाठपुरावा इ. माहिती आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

अनेक गावांची तक्रार आहे की, कायदा झाल्यावर अंमलबजाणी दरम्यान जी पत्रके/परिपत्रके शासनाने काढली ती संबंधित विभागांकडे पोचली नाहीत किंवा संबंधित विभागांकडे पोचल्यावर ती लोकांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था केलेली नाही. ती फाईल्समध्येच बंद पडून राहतात, असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कायद्याच्या अंमलबजावणीदरम्यान शासनाने काढलेली सर्व परिपत्रके टी.आर.टी.आय. ने त्यांच्या वेबसाईटवर टाकावी.

त्यामुळे कोणती परिपत्रके कशासाठी काढली गेलीत, हे लोकांना कळेल. अनेकदा लोक महसूल विभाग व उपखंडस्तरीय समितीकडे गेल्यावर कळते की लोकांना अडचणी निर्माण करणारी काही परिपत्रके निघाली आहेत. म्हणून ही पारदर्शकता असणे आवश्यक आहे. ज्या दिवशी परिपत्रक काढले गेले असेल ते टी.आर.टी.आय. ने त्याच दिवशी वेबसाईटवर टाकावे. जेव्हा परिपत्रके स्थानिक कार्यालयांकडे पोचतात, ती त्वरित ग्रामस्थांसाठी जाहीर करावीत, असा स्पष्ट आदेश शासनाने त्यावर द्यावा.

टी.आर.टी.आय. ने कायद्याचे आदिवासी भाषांमध्ये भाषांतर केले आहे, असे वेबसाईटवर म्हटले आहे. त्यापैकी गोंडी भाषेतील म्हणून जे प्रारुप वेबसाईटवर ठेवले आहे, ती भाषा गोंडी नाही. अजूनही गोंडी भाषेत कायदा उपलब्ध नाही. याबाबत मेंढा (लेखा) चे देवाजी तोफा यांनी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवली होती. स्वत: गोंडी भाषेत कायद्याचे भाषांतर करुन आदिवासी विभागाकडे त्यांनी नेऊन दिले. परंतु अजूनही टी.आर.टी.आय. ने ती दुरुस्ती केलेली नाही. गोंडी भाषेतील कायदा अजूनही का वेबसाईटवर टाकला नाही, याचा खुलासा टी.आर.टी.आय. ने करावा.

१७ ऑगस्ट २००९ नंतर वेबसाईटवर नवीन माहिती टाकण्यात आलेली नाही. १५ ऑगस्ट २००९ रोजी गडचिरोली जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी व तत्कालीन पालकमंत्र्यांनी सामूहिक दावे मंजूर केल्याची घोषणा केली. २८ ऑगस्ट २००९ रोजी भूमी अभिलेख सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांसह तयार झाला. हा भूमी अभिलेख मेंढा व मारदा गावाच्या ग्रामस्थांना राज्यपाल श्री. जमीर यांनी १५ डिसेंबर २००९ रोजी सुपूर्द केला. हा वृत्तांत टी.आर.टी.आय. ने वेबसाईटवर सविस्तर दिल्यास अनेक गावांना सामूहिक दावे करण्याची प्रेरणा मिळू शकते. सर्वसाधारण माहितीखाली जे अपडेट देण्यात आले आहे, तिथे सामूहिक दावे अजूनही शून्य

दाखवण्यात आले आहेत. खरे तर शासनासाठी पण ही जमेची बाजू असल्याने त्वरित दुरुस्ती करुन 'दोन' सामूहिक दावे मंजूर झाल्याचे वेबसाईटवर टाकावे.

- टी.आर.टी.आय. ने 'सोमा' नावाचा जो लघुपट बनवला आहे, त्यात व इतर जिंगल्समध्ये व्यक्तिगत दाव्यांसंदर्भातच माहिती दिली आहे व तीही अपुरी आहे. 'ग्रामसभे'च्या सक्षमीकरणाबाबत आणि सामूहिक दावे कसे भरावेत याबाबत जागृती केलेली दिसत नाही. त्यासाठी नवा लघुपट निर्माण करावा.

- तसेच सामूहिक हक्क म्हणजे नेमके काय, याची सविस्तर माहिती द्यायला हवी. सामूहिक हक्क म्हणजे शाळा, दवाखान्यापुरता सार्वजनिक सुविधांसाठीचा हक्क अशी संकुचित व्याख्या करू नये. ती केल्यामुळे लोकांमध्ये गैरसमज निर्माण होतात. टी.आर.टी.आय. ने कायद्यांतर्गत 'सामूहिक हक्क दावे' म्हणजे काय अपेक्षित आहे, हे सांगण्यासाठी ज्यांनी हे दावे यशस्वी करुन दाखवले, त्या ग्रामस्थांपैकी कुणी व्यक्ती किंवा तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती घ्याव्या व लोकांना मार्गदर्शन करावे.

- ज्या शासकीय अधिकाऱ्यांनी, उदा. अतुल पाटणे यांनी विशेष परिश्रम करुन सर्वाधिक व्यक्तिगत व दोन सामूहिक दावे मंजूर केले अशा अधिकाऱ्यांच्या मुलाखती घ्याव्या. तसेच कायद्यात नमूद केल्याप्रमाणे जी संपूर्ण नकाशांसह 'किट' दामोदर नानेंसारख्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी देण्याची तत्परता दाखविली, त्यांची मुलाखत घ्यावी. असे शासकीय अधिकाऱ्यांचे प्रयत्न आदिवासी विकास विभागाने वाखाणले, तर इतर ठिकाणी शासकीय अधिकारी आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रेरणा घेऊ शकतात.

## संस्था, संघटनांनी काय करावे...

आदिवासी व अन्य परंपरागत वननिवासी यांना कायदा समजवून देण्यात जिथे प्रशासन कमी पडते आहे, तिथे वनहक्क विषयक काम करणाऱ्या संस्था–संघटनांची जबाबदारी खूप जिकिरीची आहे. अनेक संघटनांनी व व्यक्तींनी देशभरात वनहक्कांविषयी आंदोलन करुन हा कायदा करण्यास शासनास भाग पाडले. आदिवासींच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संघटनांचे समन्वय व जनआंदोलनांनी कायदा अस्तित्त्वात आल्यावर त्याच्या अंमलबजावणीसाठी अनेक प्रयत्न केले. पण जिथे संघटना, संस्था नाहीत अशा दुर्गम भागात अजूनही कायदेविषयक जागृती नाही. त्यामुळे (१) ग्रामसभा सक्षम करण्यासाठी लोकांना जागृत करणे, (२) वनहक्क समितीसाठी कोरम पूर्ण करण्यासाठीची जागरुकता करणे, (३) सामूहिक वनहक्क दाव्यांचे फॉर्म्स भरुन देण्यासाठी लोकांना मदत करणे तसेच (४) सामूहिक वनहक्क दावा केल्यास आपोआपच वैयक्तिक हक्कांचे दावे समांतरपणे सोबतच करुन घेता येतील, याबाबत लोकांची मानसिकता तयार करणे आवश्यक आहे.

लवकरात लवकर दावे मंजूर व्हावेत यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी दाव्यांचे फॉर्म्स भरुन देण्यासाठी ज्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण केले आहे, अशा तहसीलदार, नायब तहसीलदार, पटवारी, ग्रामसेवक यांना दावे भरुन ते ग्रामसभेकडे मंजुरीसाठी सादर करण्याचा आदेश द्यावा, अशी मागणी करणे.



फॉर्म्स व्यवस्थित भरुन झाले की नाही, तपशील बरोबर लिहिला गेला का नाही, हे ग्रामसभेत लोकांनी पाहावे. नसेल तिथे लोकांनी तपशील भरावा, फॉर्म दुरुस्त करावा व वनहक्क समितीकडे दावा नंतर सुपूर्द करावा. ही प्रक्रिया केल्यास कागदांची/फॉर्म्स वगैरे गोष्टींची जी भीती लोकांच्या मनात असते, ती कमी होईल.

ग्रामसभा हे कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठीचे मूळ केंद्र आहे. त्यामुळे कायदा लागू झाल्यानंतर लोकांनी दावे दाखल करण्याची मुदत ग्रामसभेने ठरवावी, यासाठी जनसंघटनांनी आग्रह धरला पाहिजे. कारण त्या गावातील लोकांना दावा कसा करायचा इथपासून शासनाजवळ असलेले पुरावे जोडणे आणि स्वत:च्या गावाच्या चतु:सीमा निश्चित करण्यासाठी साधारणत: किती कालावधी लागेल इथपर्यंत सारे त्या गावातील वनहक्क समितीला व ग्रामसभेलाच समजू शकते. जंगलाचे संरक्षण व संवर्धन व्यवस्थित व्हावे, याची आता मुख्य गरज निर्माण झाली आहे. म्हणून वनाधिकार कायद्यासोबतच जैवविविधता अधिनियम २००२ च्या अंतर्गत सर्व गावांची 'जैवविविधता नोंद' रजिस्टर (पी.बी.आर.) तयार व्हायला हवे. मेंढा (लेखा) गावाचे पी.बी.आर. म्हणजे महुआ नावाचा एका गावाच्या जैवविविधतेची नोंद असलेला ग्रंथ इंटरनेटवर उपलब्ध आहे. तो बघून तशाप्रकारे तज्ज्ञांसोबत बसून आपापल्या गावांचे रजिस्टर लोकांनी तयार करावे. या अधिनियमांतर्गत जैवविविधता जतनासाठी लोकांनी काय करावे, याबाबतच्या सूचना आहेत. त्याचा समग्र अभ्यास करून जैवविविधता जोपासण्यासाठीचे नियोजन करुन आजवर फक्त उद्योगधंद्यासाठी चालवलेल्या एकसाची झाडे लावून जंगल तयार करण्याच्या पद्धतीला आळा घालता येईल, असे मेंढा व मारदा या दोन्ही गावांना वाटते.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना या दोन्ही योजनांसंदर्भात मेंढा (लेखा) व मारदा दोन्ही गावे जागृत आहेत. या योजनांमधून जैवविविधता वाढवण्यासंदर्भात, जंगल संरक्षण –संवर्धनाची कामे मागण्याचे त्यांनी ठरविले आहे. ती कामे पुरवण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा. मेंढा (लेखा) व मारदा गावाला राज्यपालांच्या हस्ते जे भूमी अभिलेख मिळालेत, त्यांच्या प्रती करुन संघटना, संस्थांनी गावागावात दाखवाव्या. या दोन्ही गावांचे अनुक्रमे ४५२८.८२ व २२७८.८२ एकर जमिनीवर प्रस्थापित झालेले वनहक्क दाखवणारे भूमी अभिलेख बघून आपल्या गावांचे सामूहिक हक्कांचे दावे करण्याची प्रेरणा इतर अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वननिवासींना होऊ शकते.

# आता समोर वनव्यवस्थापनाचे नवे आव्हान

मेंढा (लेखा) व मारदा गावाचे उदाहरण समोर ठेवून गडचिरोली जिल्ह्यात आणखी ६० गावांनी तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील २६ गावांनी सामूहिक दावे दाखल केल्याची खबर आहे. एकीकडे आदिवासी व अन्य परंपरागत वननिवासी आजवर ज्या जंगल जमिनीवर निर्भर होते, त्यावर त्यांचा हक्क प्रस्थापित झाला आहे. तसेच ते आता अतिक्रमणदार किंवा चोर ठरवले जाऊ शकत नाहीत. पूर्वीप्रमाणे वनविभागाला, कंत्राटदारांना कंपन्यांना आता मूळ हक्क असणाऱ्यांच्या जंगल जमिनींवर घुसून आपले खिसे आता भरुन घेता येणार नाहीत. पण गेल्या अनेक वर्षात आदिवासींचा, परंपरागत वननिवासींचा स्वत:वरचा विश्वास कमी झाला आहे हे एक वास्तव आहे. हा आत्मविश्वास त्यांना परत मिळायला हवा. जंगलांचे नियोजन व व्यवस्थापन या सर्व गावांनी नीट करावे, यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळायला हवे.  मेंढा (लेखा) गावासारखीच सर्वसहमतीने निर्णय घेणारी ग्रामसभा व त्याला पूरक आवड असणाऱ्यांचे अभ्यास मंडळ अशी रचना प्रत्येक गावात बनेल आणि अभ्यास – निर्णय – कृती – अभ्यास अशी चक्री अभ्यास प्रक्रिया इतर गावातही सुरु होईल. यचसाठी शासनानेही गावकऱ्यांना सहयोग करण्याची गरज आहे.

'फ्लो–चार्ट' मध्ये टी.आर.टी.आय. च्या वेबसाईटवर अशी प्रक्रिया जिल्हास्तरावर सुरू करावी, असे मत व्यक्त केले गेले आहे. परंतु पुढे ही प्रक्रिया कशी होईल याबाबत काहीही सुतोवाच केलेले नाही. आता कायद्याची अंमलबजावणी जसजशी होऊ लागली आहे, तसतशी जंगल संरक्षण–संवर्धन व्यवस्थापनाची गरज अधिकच निर्माण होऊ लागली आहे. टी.आर.टी.आय. व आदिवासी विकास विभागाने या संदर्भात तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे. जैवविविधता शास्त्रज्ञ, वनहक्क विषयक काम करणारे सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण तज्ज्ञ, वनाचे अभ्यासक तसेच शासनातर्फे वनविभाग, महसूल विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, कृषी विभाग, रोहयो विभाग यांचा एकेक प्रतिनिधी घेऊन जंगल व्यवस्थापनासंदर्भात 'समिती' त्वरित नेमावी. या संदर्भात परिसंवाद व प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करावे.

वातावरणात होत चाललेल्या बदलांमुळे आज संपूर्ण जग चिंतेत बुडाले आहे. जंगलाचा माणसाने केलेला ऱ्हास हे वातावरण बदलाचे प्रमुख कारण आहे, हे आता सर्वांना माहीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर ज्यांना जंगलाची नाडी समजते, जे जंगलाला आपली आई मानतात, जे तिच्या रक्तावर आपण पोसले गेलो असे मानतात, अशा आदिवासी व परंपरागत वननिवासींच्या हाती आता जंगलावरची मालकी परत कायद्याने प्रस्थापित होत आहे. तेव्हा नवे तंत्रज्ञान, वैज्ञानिक दृष्टी, पर्यावरणाचा जगभरात चाललेला अभ्यास, संशोधन याची जोड देऊन आदिवासींना आधुनिक पद्धतीने जंगल संरक्षण–संवर्धनासाठी तयार करणे गरजेचे आहे. या व्यवस्थापनासाठी आदिवासी व अन्य परंपरागत वननिवासींच्या मुला–मुलींना मूलभूत आरोग्य सुविधा, पोषक आहार, प्राथमिक शिक्षण व्यवस्था देणे गरजेचे आहे. त्यांच्यातील तरूण/तरुणींना योग्य तांत्रिक व व्यवस्थापकीय प्रशिक्षण देण्याची गरज आहे. हे सर्व करताना त्यांच्याकडे असलेले जंगलाबाबतचे पारंपरिक

ज्ञान, समज व कौशल्य इतर समाजातील लोकांनी शिकणे गरजेचे आहे. मनुष्याला वाचवायचे असेल तर सृष्टीला वाचवावे लागेल, म्हणून हा कायदा राबवावा लागेल. जंगलाच्या लेकरांना जसे हा कायदा संरक्षण देतो आहे, तसेच तो शाश्वत विकासासाठी चंगळवादी समाजालाही आवाहन करत आहे. आता गरज आहे जंगल वाचवण्यासाठी आदिवासी व पारंपरिक वननिवासींच्या हक्क संरक्षणाची व त्यांना व्यवस्थापनासाठी मदतीचे हात पुढे करण्याची. तेच खरे सर्व सामाजिक चळवळींसमोरचे आव्हान आहे. शासनाचीही यात खरी कसोटी आहे. ही कहाणी पिढ्या न् पिढ्या जंगल जतनाची ठरत पुढे पुढे जंगलासारखी विस्तारत जावी ही अपेक्षा ......



# प्रक्रिया वनहक्क दावे प्रस्थापित करण्याची : कायद्याची लढाई कागदानेच

मेंढा (लेखा) व मारदा गावातील अनेक लोक शिक्षित नाहीत. परंतु ते कागदपत्रे व कायद्याच्या अंमलबजावणीसाठी लागणारे शासकीय दस्तऐवज इ. गोष्टींनी धास्तावले नाहीत. कारण त्यांनी गावातील शिक्षित सहकाऱ्यांकडून तो कायदा ग्रामसभेत संपूर्ण वाचून काढला. कायद्यातील प्रत्येक गोष्ट मोहन हिराबाई हिरालाल, सुबोध कुलकर्णी, नितीन बारसिंगे, शिवाजी नरोटे व मंदा तोफा यांच्याकडून बारकाईने समजून घेतली. कायद्याची लढाई कागदांनीच जिंकायची हे त्यांनी ठरवले आणि वाचता न येणारी अक्षरे दुसऱ्यांकडून वाचन करवून समजून घेतली. खरेतर कायद्यानुसार हक्क पदरात पाडून घ्यायला समजून घ्यावी लागते ती कायद्याची प्रक्रिया. गुंतागुंतीचे, कठीण, दुर्बोध शब्द बाजूला सारुन लोकांना सुलभपणे सांगणारे कार्यकर्ते सोबत असले की ही प्रक्रिया लांबलचक, दीर्घ असली तरी बळ येते. कागदांचा व कायद्याचा शासनाने उभा केलेला बागुलबोवा मग कुठल्याच हक्कांच्या आड येऊ शकत नाही. अडवणूक केली तर संघर्ष करायलासुद्धा बळ येते.

सामूहिक वनहक्क दाव्यांसाठीच्या प्रक्रियेचे टप्पे समजून घेण्यासाठी आम्हाला इतर लोकांनी जे अनेक प्रश्न विचारले, त्या प्रश्नांच्या उत्तरातूनच आपल्याला ही प्रक्रिया समजून घेता येईल. ती प्रक्रियाच येथे विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

## सामूहिक वनहक्क दावा प्रक्रिया

**१. या कायद्यातील हक्कांसाठी गावकरी पात्र होते का?**

मेंढा (लेखा) व मारदा गावातील सर्व ग्रामस्थ हे अनुसूचित जमातीचे असून या कायद्यातील हक्कांसाठी ते पात्र होते. ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी गावातील सर्व सदस्य अनुसूचित जमातीचे असल्याचे व ते दाव्यांसाठी पात्र असल्याचे प्रमाणपत्र दिले. हा कायदा अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वननिवासींसाठी असल्याने कायद्यातील पहिली अट ते पूर्ण करीत होते.

**२. गावकऱ्यांनी वनहक्क समितीची स्थापना कशी केली?**

गावकऱ्यांनी कायद्यात सांगितल्याप्रमाणे वनहक्क समितीची स्थापना केली. त्यांनी प्रथम गावाची 'ग्रामसभा' बोलावली. ग्रामसभेत वनहक्क समिती स्थापन करण्याचा ठराव केला व तो सर्वसहमतीने मंजूर झाला. या समितीमध्ये त्यांनी ३ महिला सदस्य व ६ पुरुष सदस्यांची निवड केली. वन–हक्क समितीने आपले अध्यक्ष व सचिव यांची निवड केली. उपविभागस्तरीय समितीला त्या दोघांची नावे कळवली.

**३. गावाने ग्रामसभा घेऊन स्वतंत्र वनहक्क समिती स्थापन केली का?**

हो. कायद्यामध्ये असे लिहिले आहे की गट ग्रामपंचायतीमधील महसूल गावे अतिदुर्गम क्षेत्रात, तसेच एकमेकांपासून दूर असतील तर गावानेच ग्रामसभा घेऊन स्वतंत्र वनहक्क समिती स्थापन करावी. हे विधान पाडे, टोले यांना सुद्धा लागू आहे. मारदा व मेंढा गावात हीच परिस्थिती अस्तित्वात असल्याने त्यांनी आपल्या गावाची ग्रामसभा घेऊन स्वतंत्र वनहक्क समिती स्थापन केली.

**४. गावकऱ्यांनी सामूहिक वनहक्क दाव्याचा फॉर्म कसा भरला?**

- गावकऱ्यांनी सुरवातीला फॉर्म 'ख' घेऊन वनजमिनीच्या सामूहिक हक्क दाव्याचा अर्ज नियम ११ (१) (क) व (४) नुसार संपूर्ण आवश्यक तपशीलासह भरला.

  अ) हा आवश्यक तपशील भरताना निस्तारसारख्या सामूहिक हक्कासाठी अधिनियम कलम ३ (१) (ख) यानुसार निस्तार पत्रकातील सर्व्हे नंबर, कंपार्टमेंट नंबर व वन नकाशाप्रमाणे सर्व्हे नंबर व कंपार्टमेंट नंबर यांची नोंद केली.

  आ) निस्तार हक्कासाठी व गौण वन उत्पादनावरील हक्कांसाठी मारदा गाव जे उपलब्ध असलेले क्षेत्र पिढ्या न् पिढ्या वापरत आले आहे, त्याची नोंद या दाव्यात केली.

  इ) निस्तार पत्रक, गाव नकाशा व वन नकाशा शासनाकडे असल्यामुळे त्याच्या प्रती गावकऱ्यांनी दावा अर्जासोबत जोडल्या नाहीत व तसे अर्जात नमूद केले. शासनाने नकाशे बघून गावकऱ्यांनी खरे लिहिले किंवा नाही याची पडताळणी करावी, असे सुद्धा स्पष्ट केले.

## ५. सामूहिक वनहक्क दाव्याचा फॉर्म भरुन गावकऱ्यांनी कुणाकडे दिला?

* हा दावा त्यांनी वनहक्क समितीकडे सादर केला.
* वनहक्क समितीने सामूहिक वनहक्क दाव्याचा फॉर्म गावकऱ्यांकडून स्वीकारला. तो संपूर्ण वाचून काढला.
* वनहक्क समितीने दाव्याचा फॉर्म स्वीकारल्यानंतरच्या पंधरा दिवसांनी नियम १२ (१) अन्वये वनहक्क पडताळणीसाठी सूचना काढली.
* वनहक्क दावा पडताळणीबाबत कोणत्या दिवशी ग्रामसभा बोलवण्यात येत आहे ते सूचनेत नमूद केले होते.

## ६. वनहक्क दावा पडताळणीची सूचना आल्यावर लोकांनी काय केले?

* ही सूचना ग्रामपंचायत कार्यालयाच्या भिंतीवर जाहीरपणे लोकांतर्फे लावण्यात आली.
* त्याचप्रमाणे गडचिरोली जिल्ह्याच्या वनविभाग महसूल खाते, तालुका भूमी अभिलेख कार्यालय, तहसीलदार व पटवारी यांना सूचना पाठविण्यात आली.
* विशेष म्हणजे तिथे काम करणाऱ्या सामजिक संस्थेच्या प्रतिनिधींना वनहक्क समितीच्या दावा पडताळणीच्या कामामध्ये उपस्थित राहून मार्गदर्शन करावे अशी विशेष सूचना देण्यात आली होती. सूचनेत दिलेल्या तारखेनुसार ग्रामसेवक, वन विभागाचे प्रतिनिधी, संस्थेचे प्रतिनिधी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## ७. या पडताळणीसाठी सर्व संबंधित सरकारी अधिकारी उपस्थित होते का?

महसूल खाते, तालुका भूमी अभिलेख कार्यालय यांचे प्रतिनिधी यापैकी मारदा गावात कोणीही उपस्थित नव्हते. परंतु ग्रामसेवक उपस्थित होते. सर्वप्रथम आवश्यक असलेल्या गणपूर्तीबाबत खात्री करण्यात आली. गणपूर्ती झाली आहे हे बघून पडताळणी करायचे ठरले. मेंढा (लेखा) मध्ये मात्र संबंधित अधिकारी उपस्थित होते. त्यांच्यासमोर पडताळणी करण्यात आली.

## ८. वनहक्क समितीसमोर दावा आल्यावर त्यांनी काय केले?

वनहक्क समितीसमोर प्रस्तुत केलेला दाव्याच्या आधारे पडताळणी करण्यात आली. पडताळणीचा अहवाल वनहक्क समितीच्या सचिवांनी तयार केला. वरील अहवाल ग्रामसभेचे ग्रामसेवक यांना सुपूर्द केला. .

## ९. ग्रामसभेने दाव्यावर काय कारवाई केली?

वरील दाव्यांच्या संदर्भात ग्रामसभेला साहाय्यभूत ठरेल म्हणून सभेच्या सुरुवातीला अधिनियमातील तरतुदी समजावून सांगितल्या. त्या लक्षात घेऊन ग्रामसभेने दाव्यावर सविस्तर चर्चा केली. दावा योग्य असल्याने ग्रामसभेने तो मंजूर केला. मग ग्रामसेवकाने दाव्यासंदर्भात नमुन्यानुसार अहवाल तयार केला. हा अहवाल दावा आणि दाव्याचा पडताळणी अहवाल, ही तिन्ही कागदपत्रे उपविभागीय समितीकडे पाठविली.

**१०.पुरावा आपल्याजवळ नसला तर काय करायचे? पुरावे देण्याची जबाबदारी सरकारची नाही का?**

कार्यवाहीसाठी पुढील पुरावे सरकारनेच ग्रामस्थांना उपलब्ध करुन दिले पाहिजे असे कायदा सांगतो. कारण ही सगळी सरकारी कागदपत्रे असून दावे करणाऱ्यांना हा दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कायद्यानुसार उपविभागीय अधिकाऱ्यांकडे दिली गेली आहे.

**११. दाव्यासाठी लागणारे पुरावे कोणते? त्यांची नोंद कोणत्या विभागाकडे असते?**

कार्यवाहीसाठी लागणारे पुरावे :-

**१. निस्तारपत्रक :**

अपेक्षित पुरावा : निस्तारपत्रक हा महाराष्ट्र राज्य राजस्व संहिता १९६६ च्या तरतुदींनुसार कायदेशीर अभिलेख असतो. निस्तारपत्रक हा एक भक्कम पुरावा असतो.

गावाने दिलेला पुराव्यासाठीचा तपशील : हा तपशील गाव समाजाच्या हक्काची नोंद असलेल्या शासकीय अभिलेखामध्ये आहे. त्यामध्ये मारदा गाव समाजाचे निस्तारहक्क एकूण २२७८.८१ एकर मध्ये असल्याचे स्पष्ट नमूद आहे. तसेच मेंढा (लेखा) गाव समाजाचे निस्तारहक्क एकूण ४५२८.८२ एकर मध्ये असल्याचे स्पष्ट नमूद आहे.

**२. राजस्व नकाशा :**

अपेक्षित पुरावा : राजस्व नकाशा हा तलाठी दफ्तर व महसूल विभागाकडे उपलब्ध असतो.

गावाने दिलेला पुराव्यासाठीचा तपशील : गाव हद्दीतील संपूर्ण वनक्षेत्रावर मारदा व मेंढा (लेखा) गाव समाजाचे निस्तारहक्क परंपरेप्रमाणे व भू-राजस्व संहितेप्रमाणे आहे. ते क्षेत्र राजस्व नकाशात दाखविलेले असल्याने पुन्हा मोजणी करुन नकाशा तयार करण्याची आवश्यकता नाही, असे गावकऱ्यांनी ठासून सांगितले.

**३. वन नकाशा :**

अपेक्षित पुरावा : वन नकाशा हा वनविभागाकडे उपलब्ध असतो.

गावाने दिलेला पुराव्यासाठीचा तपशील : मारदा व मेंढा (लेखा) गावहद्दीमध्ये कोणते कंपार्टमेंट नंबर येतात हे या नकाशात दर्शविले होते. तो नकाशा वन विभागाकडेच आहे. हे ग्रामस्थांनी लक्षात आणून दिले.

**४. बंदोबस्त मिसल :**

अपेक्षित पुरावा : बंदोबस्त मिसल म्हणजे सेटलमेंट सर्व्हे. कायद्यानुसार हा फारच महत्त्वाचा दस्तऐवज आहे. यात सर्व्हे झालेल्या गावांची नोंद असतेच. तसेच गावाची सरहद्द कुठपर्यंत आहे याचा हा भक्कम पुरावा असतो. महसूल विभागाकडे जमीन नोंद विभाग स्वतंत्र असतो. त्यांच्याकडे व भूमी अभिलेख अधिकारी यांच्याकडे बंदोबस्त मिसलचा दस्तऐवज उपलब्ध होऊ शकतो.

गावाकडे दिलेल्या पुराव्याचा तपशील : पुरातन काळापासून मेंढा (लेखा) व मारदा गाव समाजाचा गाव हद्दीतील संपूर्ण वनक्षेत्रावर हक्क आहे हे या शासकीय अभिलेखाच्या आधारे सिद्ध होते. हा पुरावा भूमी अभिलेख कार्यालयाकडून घ्यावा असे ग्रामस्थांनी सांगितले.

**५. प्रत्यक्ष जमिनीवरील पुरावा** :

अपेक्षित पुरावा : पुरातन काळापासून ते आजपर्यंत गाव समाज निस्तारहक्काचा व त्याशिवाय इतर वनहक्कासाठी ज्या जमिनीचा उपयोग करीत आहे तोच त्या जमिनीवरील प्रत्यक्ष पुरावा असतो.

गावाने दिलेला पुराव्यासाठीचा तपशील : पुरातन काळापासून ते आजपर्यंत मेंढा (लेखा) गाव समाजातील सदस्य निस्तारहक्काचा उपभोग घेत आहेत. या तपशीलाद्वारे ते प्रत्यक्ष जमिनीवरील पुरावे देऊ शकले.

**१२. विकास प्रकल्पांसाठी सरकारकडून व्यवस्थापन केल्या जाणाऱ्या सामूहिक हक्कांच्या जमिनी कोणत्या? त्यासाठी सामूहिक हक्क दाव्यांमध्ये काय तरतूद आहे? आणि गावांनी पुराव्यासाठी काय तपशील द्यावा लागतो?**

कलम ३.२ अंतर्गत तरतुदींसाठी शासनाने स्वतंत्र अध्यादेश काढले आहेत. आता त्या अध्यादेशानुसारच कारवाई करावी लागेल.

**१३.जैवविविधता पुरावा म्हणजे नेमके काय? त्यासाठी गावाने काय करावे? त्या संदर्भात काही नियम आहे का?**

जैवविविधता अधिनियम २००२ चा नियम २२,

अपेक्षित पुरावा : जैवविविधता अधिनियम २००२ मधील कलम ४१ व जैवविविधता आधिनियम २००२ चा नियम २२ नुसार ग्रामपंचायतीने जैवविविधता व्यवस्थापन समितीची स्थापना करावी. या समितीने प्रत्येक गावसमाज व मोहल्ल्याचे जैवविविधता नोंदणीपत्रक (पी.बी.आर.) तयार करुन घ्यावे व पडताळणी करावी. हे जैवविविधता नोंदणी पत्र म्हणजे वरील पुरावा आहे.

गावाने दिलेला पुराव्यासाठीचा तपशील : या तरतुदीनुसार गावपातळीवरील जैवविविधता संरक्षण टिकावू उपयोग व उत्पन्नात न्यायोचित वाटा यांचे अधिकार दिले आहेत. सुयोग्य नियोजनाकरिता ''गावाचे जैवविविधता नोंद रजिस्टर'' तयार करुन त्याचा उपयोग जैवविविधता पुरावा म्हणूनच करावा असे नियमामध्ये म्हटल्याप्रमाणे मारदा व मेंढा गावसमाजाने स्वत:चे जैवविविधता नोंदणीपत्रक (पी.बी.आर.) तयार करुन तो पुरावा दिला.

**१४.ग्रामवन घोषित करुन व्यवस्थापनासाठी दिले नसेल तर काय करावे?**

भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २८ ग्रामवन.

**अपेक्षित पुरावा :** भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम २८ मध्ये गावासभोवतालच्या वनाचे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामवन घोषित करुन ते व्यवस्थापनासाठी गाव समाजाकडे हस्तांतरित करण्यात यावे.

गावाने दिलेला पुराव्यासाठीचा तपशील : गावसभोवतालच्या वनाचे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन त्या गाव समाजानेच करावे याकरताच कायद्यात ही तरतूद अनेक वर्षांपासून आहे. परंतु त्याची अंमलबजावणी मारदा व मेंढा गावात करण्यात आली नाही. पण त्यासाठीच हा दावा असल्याने आता वनहक्क प्रस्थापित होत असल्याने गावावरच व्यवस्थापनाची जबाबदारी येणार आहे.

**१५. निस्तार व्यवस्थापनासाठी शासकीय समितीने काय सुचविले आहे?**

गावाने दिलेल्या पुराव्यासाठीचा तपशील : महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एस ३०/२००० प्र.क्र. २१५ ए ६, दिनांक १०/११/२००० द्वारा गठीत निस्तार आढावा समितीने सुयोग्य निस्तार व्यवस्थापनासाठी गावासभोवतीचे निस्तारासाठी गाव समाजाला आवश्यक असलेले वन भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम २८ नुसार ग्रामवन घोषित करुन गाव समाजाच्या स्वाधीन करावे अशी शिफारस केली आहे. त्या अनुसारच मारदा व मेंढा (लेखा) गावसमाजाने केलेला दावा अगदी योग्य असाच आहे.

**१६. परिस्थितीजन्य पुरावा म्हणजे काय? गावसमाजाने वनसंसाधनांच्या जमिनीचा नकाशा तयार करताना त्यात कोणत्या गोष्टी दाखवायला हव्यात?**

**अपेक्षित पुरावा :** गावसमाजाने ह्या सामूहिक वनसंसाधनाच्या जमिनीचा नकाशा तयार केला पाहिजे. तसेच ह्या नकाशात झाडे, पाणी, दफनभूमी, धार्मिक स्थळे, देवराया इ. संसाधने दाखवता येतील.

गावांनी दिलेला पुराव्यासाठीचा तपशील : परंपरेनुसार जिथे नियमित पूजा केली जाते अशा देवांच्या जागा दावा केलेल्या वनक्षेत्रात आहेत. त्याची यादी दाव्यात दिलेलीआहे. या जागा सर्व गावकऱ्यांना लहानपणापासून माहीत आहेत व परंपरेने चालत आलेली आलेली आहेत ती त्यांच्या भाषेतील नावे सोबत दिलेली आहेत.

**१७.विशिष्ट जागेवर वन होते हे दाखविण्यासाठी गोहडूमच्या जागा हा महत्त्वपूर्ण पुरावा होऊ शकतो का?**

जिथे गोहडूम तिथे बांबू :
**अपेक्षित पुरावा :** जिथे गोहडूमच्या जागा आहेत, तिथे तिथे मोठी झाडे कमी प्रमाणात आहेत. कोदो, कुरकी इ. पारंपरिक वाणांची शेती बंद झाल्यावर तिथे बांबू मोठ्या प्रमाणात वाढला हा सुद्धा गावाचा महत्त्वपूर्ण पुरावा आहे.
गावाने दिलेला पुराव्यासाठीचा तपशील : ज्या गोहडूमच्या जागांबद्दल सामुदायिक दावा केला; त्या जागा वनहक्क समिती, उपस्थित वनविभाग राजस्व अधिकारी व पटवाऱ्यांनी मारदा व मेंढा (लेखा) गावात प्रत्यक्ष जाऊन पाहिल्या व पडताळणी केली.

**१८.निस्तार हक्क परंपरेने आहेत हे सिद्ध करण्यासाठी गावाने प्रत्यक्ष कोणते पुरावे दाखविले?**

**निस्तारपत्रक** :
मारदा व मेंढा (लेखा) गाव समाजाच्या निस्तार हक्काची नोंद शासकीय अभिलेखात आहे. मारदा गाव समाजाचे निस्तारहक्क एकूण २२७८.८१ एकरमध्ये व मेंढाचे ४५२८.८२ एकर असल्याचे त्यात स्पष्ट नमूद केले आहे. हे निस्तारपत्रक पुरावा म्हणून दाखविले.
**राजस्व नकाशा :**
गाव हद्दीतील संपूर्ण वन क्षेत्रावर मारदा व मेंढा गाव समाजाचे निस्तार हक्क परंपरेप्रमाणे व राजस्व संहितेप्रमाणे आहेत. ते क्षेत्र राजस्व नकाशात दाखवले असून पुन्हा मोजणी करुन नकाशा तयार करण्याची आवश्यकता नाही असे गावकऱ्यांनी स्पष्ट सांगितले. राजस्व विभागातच तो नकाशा उपलब्ध आहे, हे स्पष्टपणे नमूद केले.
**वन नकाशा :**
मारदा व मेंढा गाव हद्दीमध्ये कोणते कंपार्टमेंट येतात हे या वननकाशात स्पष्ट दर्शविले आहे. असा कंपार्टमेंट क्र. ८८, ८९, ९०, ९१ व गाव हद्दीतील सर्व वनजमिनीचा समावेश दाखवणारा नकाशा गावकऱ्यांनी पुरावा म्हणून सादर केला.

**१९.एकूण ग्रामस्थांनी देय वनहक्काचा काय काय तपशील दिला?**

एकूण मारदा व मेंढा (लेखा) गावातील ग्रामस्थांनी देय वनहक्काचा तपशील खालीलप्रमाणे दिला :

१. निस्तार पत्रक
२. गौण वनउत्पादनावरील हक्क
३. सामूहिक जलसंपत्ती, नदी, तलाव, बोडी, झरे, इत्यादीची यादी
४. चराई हक्कासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनीचा तपशील
५. जैवविविधता हक्क गावातर्फे ज्या जंगल जमिनीवर राबवला जात आहे, त्याचा तपशील
६. निरंतर वापर करण्यासाठी पारंपरिक वनस्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन, पुनर्निमाण व व्यवस्थापन करण्याचा हक्क, देवाच्या जागा, गोहडूम यावरील हक्कांकरता मारदा व मेंढा (लेखा) गाव समूहाने निस्तारपत्रकात सर्व सर्व्हे नंबर तसेच वन नकाशाप्रमाणे कंपार्टमेंट नंबर, एकूण क्षेत्र हेक्टर वनजमिनीवर सामूहिक दावा केला आहे.
सामूहिक हक्क दावा क्र. ३ (घ–१) सध्या वापरत असलेल्या सामूहिक जागा (घ–२) भविष्यात संकल्पित प्रकल्पासाठी दावा केलेले क्षेत्र.

**२०. दावा वनहक्क समितीकडे आल्यावर वनहक्क समिती पडताळणीसाठी नोटीस पाठवते का?**

दावा दाखल झाल्यावर वनहक्क समिती गावकऱ्यांसोबत चर्चा करुन पडताळणीची तारीख ठरवते. गावकऱ्यांनी ठरवलेल्या पडताळणीच्या तारखेच्या ८ दिवस अगोदर वनहक्क समितीने नोटीस काढणे बंधनकारक असते. ही नोटीस वन विभाग अधिकारी, राजस्व अधिकारी, भूमी अभिलेख अधिकारी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना पाठवायची असते. त्याप्रमाणे मारदा व मेंढा (लेखा) गावातील वनहक्क समितीने नोटीस काढली व वरील संबंधित अधिकाऱ्यांना पाठविली. या सर्वांनी आपापल्या प्रतिनिधींना दाव्यांच्या पडताळणीसाठी पाठवणे आवश्यक होते. ग्रामसभेची नोटीस ग्रामसभेच्या सचिवांनी नमुन्याप्रमाणे भरुन पाठवायची असते. ही नोटीस वरील अधिकाऱ्यांना देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सचिवांनी नोटीस सर्वांना पाठवली.

**२१.दाव्याची पडताळणी कोण करते?**

या पडताळणीसाठी एक ग्रामसभा बोलावली जाते, ज्यात गणपूर्तीची गरज नाही. या सभेत ज्यांना आक्षेप घ्यायचे असतील, त्यांनी ते लेखी मांडायचे असतात. त्याप्रमाणे कोणाचे आक्षेप नाहीत, हे बघून मारदा गावाने केलेला सामूहिक दावा योग्य आहे असे सांगून, दिनांक २६/०६/२००९ रोजी सरपंच श्रीमती जिजाबाई कालिदास कड्यामी यांनी दिलेल्या प्रमाणपत्राचे जाहीर वाचन करण्यात आले. त्यात प्रमाणित करण्यात आले की, मारदा ग्रामपंचायतीमधील सर्व सदस्य अनुसूचित जमातीचे आहेत. वनहक्क पडताळणीच्या वेळेस वनरक्षण श्री. ए. ए. साधुलवार यांनीही मारदा गावातील सर्व ग्रामस्थ अनुसूचित जामतीचे आहेत अशी नोंद आपल्या अहवालात केली.

**२२. वनहक्क समितीने ग्रामसभेकडे ठराव पाठवल्यावर काय घडते?**

ग्रामसभेत २/३ गणपूर्ती असणे आवश्यक आहे. तसेच १/३ महिलांची उपस्थिती अनिवार्य असते. वरील हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींचे म्हणणे ऐकून व पडताळणी अहवालाचे वाचन झाल्यानंतर त्यासंबंधी सादर कलेल्या दस्तऐवजाची पाहणी करुन दाव्यांच्या पात्रतेबद्दल ग्रामसभेत निष्कर्ष काढण्यात आले. हे निष्कर्ष व मागणीदारांच्या/समुदायांच्या वनहक्काबाबत निष्कर्षानुसार ग्रामसभेने ठराव संमत केले. हे ठराव पुढील कार्यवाहीसाठी उपविभागीय समितीकडे पाठविण्यात यावेत, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

मारदा व मेंढा (लेखा) गावांनी केलेला दावा योग्य असल्याचे त्यांच्या ग्रामसभेत सरपंच, वनहक्क समितीचे सदस्य व वनरक्षक यांनी सांगितले. ग्रामसभेत उपस्थित सर्वांकडून दिलेले तपशील व पुरावे योग्य असल्याची खात्री करुन घेऊन मग ग्रामसभेत सचिव, ग्रामसेवक, सरपंच यांनी दावा मंजूर झाल्याचे लिहून दावा मंजूर केला.

**२३. पुन्हा एकदा वननिवासी असल्याची साक्ष किंवा पुरावा बघितला जातो का? त्याची खात्री कशी केली जाते?**

उपरोक्त दाव्याबाबत प्राथमिक स्वरुपात वन निवासी असल्यासंबंधीचा साक्ष/पुरावा उपलब्ध असल्यास तो दावा पडताळणीच्या वेळी द्यावा, असे म्हटले आहे. मारदा गावात सरपंच व वनहक्क समिती यांनी गावातील सर्व गावकरी जमातीचे अनुसूचित जमातीचे असून प्राथमिक स्वरुपात वननिवासी असल्याचे पुन्हा खात्रीपूर्वक सांगितले व सरपंच, ग्रामपंचायत यांनी दिलेले प्रमाणपत्र पुरावा म्हणून दाव्यासोबत जोडले.

**२४. वनहक्क दाव्याची पडताळणी करुन तो योग्य असल्यास दावा पुढे कोणाकडे पाठवण्यात येतो? तो कोणाकडून पाठवला जातो?**

पडताळणी झाल्यावर वनहक्क समितीने दावा योग्य असल्याचा निर्वाळा दिल्यावर व तो ग्रामसभेने मंजूर केल्यावर तो उपविभागीय समितीकडे पाठविला जातो. उपविभागीय समितीकडे दावा दाखल करण्यास वनहक्क समितीचे अध्यक्ष, सचिव व ग्रामस्थ स्वत: गेले.
उपविभागीय अधिकाऱ्याने तहसीलदारांकडे जायला सांगितले. परंतु ग्रामसभेत समितीतर्फे दावा मंजूर झाल्यावर तो उपविभागीय समितीनेच स्वीकारायचा असतो. याचा आग्रह ग्रामस्थांनी धरला आणि ग्रामस्थ उपविभागीय समितीच्या कार्यालयात ठाण मांडून बसले. कार्यालय बंद होण्याच्या सुमारास उपविभागीय कार्यालयात दावा दाखल करुन घेण्यात आला.

**२५. उपविभागीय समितीने दावा दाखल करुन घेतला का?**

खरे तर तो उपविभागीय समितीने लगेच स्वीकारायचा असतो. तसा तो स्वीकारला पण कायद्याची अपूर्ण माहिती असल्याने त्यांनी तहसीलदारांना पुढील पत्र पाठवले.

## अशी केली गावकऱ्यांची अडवणूक

उपविभागीय अधिकारी गडचिरोली यांचे कार्यालय
क्रमांक उविअ/...रस्ते/काची/२३९५/२००९
दिनांक : ३१ जुलै / २००९

प्रति,
तहसीलदार,
गडचिरोली / धानोरा

विषय :– अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी कायदा २००६ नियम २००८
सामूहिक दावे तपासणी बाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, सरपंच, ग्रामपंचायत मारदा तालुका गडचिरोली व सरपंच ग्रामपंचायत लेखा तालुका धानोरा यांनी सामुहिक दाव्याचे प्रकरणे या कार्यालयास परस्पर सादर केलेले आहेत. प्रकरणांत तलाठी प्रतीवेदन व वनविभागाचे नमुना अ जोडलेले नाहीत. त्यामुळे सोबतचे प्रकरण आपणाकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात येत आहे.

चाप्त सामुहीक दावे तपासणी करुन दिनांक १२/८/२००९ चे उपविभागीय स्तरीय समितीचे सभेत मंजूरीकरिता न चुकता सादर करावे.

उपविभागीय अधिकारी,
गडचिरोली

प्रतिलीपी:– १) सरपंच, ग्रामपंचायत मारदा, तालुका गडचिरोली यांना माहितीस अग्रेषित.

उपविभागीय अधिकारी,
गडचिरोली

* उपविभागीय अधिकाऱ्याच्या सही–शिक्क्यानिशी आलेल्या या पत्रात तहसीलदारांना पत्र पाठवल्याचे नमूद केले होते.
* परंतु, ग्रामस्थ जेव्हा तहसील कार्यालयात गेले आणि तहसीलदारांकडे असे पत्र आले का याची चौकशी केली, तेव्हा असे कुठलेही पत्र आले नसल्याचे तहसीलदारांनी त्याना सांगितले. गावकऱ्यांनी तहसीलदारांना पत्र न मिळाल्याचे लेखी स्वरुपात निवेदन देण्याचे व ते उपविभागीय अधिकाऱ्यास पाठविण्यास सांगितले. तहसीलदारांनी अशा प्रकारचे पत्र लिहून सोबत तलाठी प्रतिवेदन व वनविभाग नमुना 'अ' जोडण्याची दाव्यात गरज नाही, तसे अधिनियमात म्हटले नाही, हेसुद्धा स्पष्ट केले.
* या अनुषंगाने परत एकदा तहसीलदारांचे लेखी खुलासा पत्र घेऊन ग्रामस्थ उपविभागीय समितीकडे गेले.
* यावेळी उपविभागीय अधिकाऱ्याने स्वत:हून कायद्याबद्दल आपणास सविस्तर माहिती नव्हती याची कबुली दिली व दावा तपासणी करण्याचे कबूल केले.

**२६.उपविभाग स्तरीय समितीकडून दोन्ही गावांचे दावे मंजूर झाल्यावर ते पुढे कुठे पाठवण्यात आले?**

* हे दावे उपविभागीय स्तरीय समितीच्या सभेत मंजूर करुन पुढे जिल्हास्तरीय समितीकडे पाठविण्यात आले.
* जिल्हास्तरीय समितीतर्फे वनविभाग अधिकारी, जिल्हाधिकारी आणि आदिवासी आयुक्त यांनी पंधरा दिवस तो दावा बारकाव्यासहित तपासला. एकेक शब्द त्यांनी वाचला. तसेच या दावा पडताळणीच्या दिवशी जिल्हास्तरीय समितीने नियुक्त केलेल्या सल्लागार समितीतील श्री. मोहन हिराबाई हिरालाल व श्री. सुबोध कुलकर्णी यांना निमंत्रित केले होते. दोघांनी जिथे जिथे गरज पडली तिथे कायद्यातील बारकावे, ग्रामस्थांनी दिलेले पुरावे व तपशील व त्या संदर्भात सरकारजवळ (जिल्हा कार्यालय, वनविभाग, राजस्व विभाग व तहसील कार्यालय इ. ठिकाणी) आधीच उपलब्ध असलेले पुरावे पुन्हा जोडण्याची गरज नाही हे स्पष्ट केले. ते पुरावे पडताळणीची विनंती केली. जिल्हा समितीमध्ये ही पडताळणी वरील उपस्थितांनी समोर पार पाडली व पुरावे खरे असल्याचे निदर्शनास आले.

**२७.म्हणजे एकूण कुठलाही अडथळा जिल्हा समितीने आणला नाही तर!**

एका छोट्याशा गोष्टीमुळे त्यांनी थोडे अडवून धरले होते. त्याचे असे झाले की, ग्रामस्थांजवळ छापील फॉर्म उपलब्ध नव्हता, त्यामुळे ग्रामस्थांनी आपल्या हस्ताक्षरात त्याची प्रतिलिपी करुन घेतली व त्यानुसार सर्व नोंदी केल्या. समितीने हा दावा हस्तलिखित असल्याकारणाने तो चालवून घेतला जाणार नाही असे सांगितले. गावात जवळ झेरॉक्सिंगची सोय नसल्याने गावकऱ्यांनी दाव्याचा फॉर्म एकही शब्द चुकीचा न लिहिता जसाच्या तसा लिहिला असून तो छापील नाही, या आधारावर फेटाळता येणार नाही, हे सल्लागार समितीने जिल्हा स्तरीय समितीच्या निदर्शनास आणून दिले आणि जिल्हा समितीने प्रत्येक शब्दाची खात्री करुन घेऊन दावा स्वीकारला.

**२८.ही प्रक्रिया एकूण किती दिवसात पूर्ण झाली? जिल्हा समितीने दावा मंजूर झाल्याचे कधी जाहीर केले?**

* दोन्ही गावांच्या संदर्भात वनहक्क समितीकडून जिल्हा समितीकडे दावा येण्याची पूर्ण प्रक्रिया ही जून–जुलै–ऑगस्टचा पहिला पंधरवडा अशा तीन महिन्यात झाली आणि १५ ऑगस्ट, २००९ रोजी जिल्हाधिकारी श्री. अतुल पाटणे व त्यावेळचे पालकमंत्री श्री. रमेश बंग यांनी मारदा व मेंढा (लेखा) या दोन गावांचे दावे मंजूर झाले, असे जाहीर केले.

* या मंजूर झालेल्या दाव्यांवर जिल्हाधिकारी, अदिवासी उपायुक्त आणि वन विभाग अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असून जिल्हाधिकार समितीचा शिक्का उठविण्यात आला आहे. दोन्ही गावांचे भूमी अभिलेख दि. २८ ऑगस्ट २००९ रोजी तयार करण्यात आले.

* हे दावे मंजूर झाल्यावर मारदा गावाला २२७८.८१ एकर तसेच मेंढा (लेखा) गावाला एकूण ४५२८.८२ एकर जमिनीवर सामूहिक हक्क प्राप्त झाला आहे, असे या भूमी अभिलेखात स्पष्ट म्हटले आहे. भूमी अभिलेख राज्यपाल श्री. जमीर यांच्या हस्ते १५ डिसेंबर २००९ रोजी झालेल्या जाहीर सभेत ग्रामस्थांना सुपूर्द करण्यात आला.

## २९.या मंजूर झालेल्या दाव्यांचा अभिलेख कधी बनवला गेला? (बघा भूमी अभिलेख )

### भूमी अभिलेख

भारत सरकार
जमाती कार्य मंत्रालय
अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे)
अधिनियम २००६, नियम, २००८
सामुहिक वन हक्कांचे हक्क
जोडपत्र – तीन (पहा नियम – ८ (ज))
जिल्हा प्रकरण क्रमांक : २२०१/०९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सामुहिक वन हक्कधारकाचे नांव / धारकांची नांवे | : | श्री. बिरजू जोगी तोफा व इतर गावकरी गावं समाज (लेखा) (मेंढा) |
| २. | गांव / ग्रामसभा | : | मु. पो. (लेखा) (मेंढा) |
| ३. | ग्रामपंचायत | : | लेखा |
| ४. | तहसिल / तालुका | : | धानोरा |
| ५. | जिल्हा | : | गडचिरोली |
| ६. | अनुसूचित जमाती आहे की / इतर पारंपारिक वन निवासी आहे. | : | अनुसूचित जमाती |
| ७. | सामुहिक हक्कांचे स्वरुप | : | गांव समाजाचे दाव्यातील बाब क्र. १, २, ३, ४, |
| ५, | | | ६, प्रमाणे निस्तार हक्क व इतर वरील नियमाप्रमाणे लागू असलेले हक्क |
| ८. | शर्ती काही असल्यास | : | शासनाचे नियमाप्रमाणे |
| ९. | रुढी प्राप्त सीमांसह / किंवा खसरा / खंड क्र. यासह ठळक सीमांचिन्हे दर्शवून केलेले सीमांचे वर्णन | : | आराजी. १८०९.६१ हेक्टर कंपा. नं. सर्वे नं. ४६८, ४६९, ४७०, ४७१, ५११ |

सामूहिक वन हक्क धारकांचे नांव (धारकांची नांवे)
१. मौजा लेखा (मेंढा) येथील समस्त नागरिक.
२. निस्तार पत्रकातील तरतुदी नुसार गौण वनस्पती
३. कायदेशीर हक्कांना मान्यता देण्यात येते.
४. दाव्यातील १, २, ३, ४, ५, ६ प्रमाणे निस्तार हक्क व इतर सर्व हक्क मान्य.

आम्ही खालील सही करणारे महाराष्ट्र शासन यांच्यासाठी व त्यांच्या वतीने, सामूहिक वनहक्कांच्या उपरोल्लिखित धारकांना शिर्षकात उल्लेखिल्याप्रमाणे वनहक्क कायम करण्यासाठी आमच्या स्वाक्षऱ्या करीत आहोत. निस्तार पत्रकात नमूद असलेले ख. नं. पुन: मोजणी नंतर बदलले असलेल्याने नवीन सर्व्हे नंबर नुसार ते लागु होतील. ज्या जमिनी पूर्वी वाटप झाल्या व आता वैयक्तिक वन हक्क देण्यात येत आहे त्या वगळून उर्वरित जमिनीवर सामूहिक हक्क लागू राहतील.

विभागीय वन अधिकारी / उप वन संरक्षक
गडचिरोली

अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग,
नागपूर

जिल्हाधिकारी / उपायुक्त

**३०.भूमी अभिलेख हातात आल्यावर आता गावांनी त्यांच्या सामूहिक जंगलाचे नियोजन करण्याबाबत कायदा काही सांगतो का?**

कायद्याच्या अधिनियमातील प्रकरण तीन कलम ५ मध्ये वनहक्कधारकाची कर्तव्ये सांगण्यात आली आहेत. एकदा वनहक्क प्रस्थापित झाला की त्यांनी खालील कर्तव्यांचे पालन करावे, असे कायद्यात नमूद केले आहे.

या अधिनियमान्वये कोणताही वनहक्क धारक

क. वन्य जीवन, वन व जैवविविधता यांचे संरक्षण करेल.

ख. लगतची पाणलोट क्षेत्रे, जलस्त्रोत व पारिस्थितिकीदृष्ट्या अन्य संवेदनाक्षम क्षेत्रे पुरेशी सुरक्षित आहेत, याची सुनिश्चिती करेल.

ग. वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी यांचे निवासस्थान, त्यांच्या सांस्कृतिक व नैसर्गिक वारसाला कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचेल अशा कोणत्याही प्रकारच्या विघातक प्रकारांपासून सुरक्षित ठेवले असल्याचे सुनिश्चिती करेल.

घ. सामाजिक वनांचे स्त्रोत मिळविण्याच्या मार्गाचे विनियमन करणे आणि वन्य प्राणी, वन व जैविक विविधता यांवर प्रतिकूल परिणाम करणारी कोणतीही कृती थांबविणे यांच्यासाठी ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयांचे अनुपालन केले जात असल्याची सुनिश्चिती करेल.

**३१.मग मारदा व मेंढा (लेखा) गावाने याबाबत काय पावले उचलायचे ठरवले आहे?**

मारदा व मेंढा (लेखा) गावाने जंगल व्यवस्थापनासंदर्भात तसेच जंगल संरक्षण व संवर्धन करण्यासंदर्भात शासनाने विशेष प्रशिक्षण ग्रामस्थांना द्यावे अशी मागणी केली आहे. त्यासाठी शासनाने जैवविविधता तज्ज्ञ, पर्यावरण तज्ज्ञ, पारंपरिक ज्ञान असलेले विशेषज्ञ, गावातील जाणकार व शासनाच्या महसूल, वनविभाग, रोहयो विभाग, सामाजिक वनीकरण, कृषी विभाग आदींशी संबंधित विभागातील एकेक प्रतिनिधी घेऊन जंगल व्यवस्थापन व नियोजन मार्गदर्शक समिती तयार करावी असे आवाहन केले आहे.

या पुस्तिकेत परिशिष्टात अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्क मान्यता) अधिनियम २००६ जोडला आहे. वरील प्रश्नोत्तरांमधून सामूहिक हक्क दाव्यांसंदर्भात तपशीलवार प्रक्रिया देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच परिशिष्टात सामूहिक दाव्याचा नमुना, मारदा गावाने केलेला सामूहिक दावा आणि गावांना प्राप्त झालेले अभिलेख जोडले आहेत.

# मारदा गाव वनहक्क दाव्यांची प्रक्रिया: दस्तऐवज*



* गावाने स्वत: हस्ताक्षरात लिहिलेल्या दस्तऐवजातील अक्षरे स्कॅनिंग करुनही स्पष्ट दिसली नसती म्हणून दाव्याची छापील नक्कल प्रत येथे जोडली आहे.

अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८

ग्राम सभेचे ठराव 'सामुहिक वन हक्कांबाबत' अर्ज दावा क्रमांक : १ ठराव क्रमांक १
''वैयक्तिक वन हक्क / सामुहिक वनहक्क'' दाव्यांच्या संदर्भात आयोजित ग्राम सभा
(प्रपत्रात माहिती भरतांना जागा कमी आढळल्यास अतिरिक्त पाने जोडण्यात यावीत.)

आज दिनांक २६/०६/०९ रोजी अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ अन्वये वन हक्क समिती, गाव ................मारदा .................... च्या अहवालाच्या संदर्भात अंतर्गत गाव ............................ तालूका .......गडचिरोली...... या ठिकाणी ''वैयक्तिक वन हक्क'' तसेच ''सामुहिक वन हक्क'' यांच्या दाव्या संदर्भात केलेल्या शिफारशीवर ग्रामसभेचा ठराव मंजूर करण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज पार पाडण्यात आले.

१. सर्वप्रथम ग्रामसभेसाठी आवश्यक असलेल्या गणपूर्तीबाबत (कोरमबाबत) खात्री करण्यात आली. ग्रामसभेमध्ये एकूण .........१४५........... ग्रामस्थ असून आज या सभेत .......११८.......... संख्येत ग्रामस्थ उपस्थित असल्यामुळे आवश्यक असलेली गणपूर्ती (कोरम) पूर्ण झाली आहे.
२. वनहक्क समितीने प्रस्तुत केलेले एकूण ........१........... इतके दावे ग्रामसभेच्या समोर ठरावासाठी ठेवण्यात आले.
३. वरील एकूण ............१.......... दाव्यांच्या संदर्भात ग्राम सभेला ठरावासाठी सहाय्यभूत ठरेल म्हणून सर्वप्रथम ग्राम सभेचे/वन हक्क समितीचे सचिव श्री. ....काशिनाथ चमरु कड्यामी............ यांनी सभेच्या सुरुवातीस ''अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८'' यातील सर्व संबंधित तरतुदी सर्व उपस्थितांना व्यवस्थितरित्या समजावून सांगितल्या.

४. वन हक्क समितीने सादर केलल्या ''सामुदायिक हक्क'' च्या दाव्या पाडताळणीसंबंधी उपरोक्त नियमातील कलम ११ (२) (५) मधील तरतुदीप्रमाणे सादर केलेल्या प्रकरणाची त्यामधील दस्तऐवजाची टप्प्याटप्प्याने तपासणी करुन त्यासंबंधात सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन आणि त्यांनी दिलेल्या निवेदन इ. विचारात घेऊन केलेली कार्यवाही व पारित केलेले ठराव खालीलप्रमाणे ......

१. अर्ज दावा क्रमांक ......१ ठराव क्रमांक १......

२. मागणीदारांचे / समुदायाचे नाव : अ) मारदा व ग्रामस्थ
(यादी जोडण्यात यावी) ब)श्री. केशव कड्यामी, श्री. यशूजी पोटावी, श्री. अडकू नरोटे,

३. दाव्याचे स्वरुप : श्री. बाजीराव पोटावी, श्री. शामराव कड्यामी, व इतर ग्रामस्थ यादी जोडलेली आहे.

(दाव्यातील वन जमिनीसाठी जे लागू आहे ते ठेवावे. क्षेत्र व वार्षिक परिमाण लिहावे.)

| हक्काचा प्रकार | कम्पा./सर्व्हे नं. | एकर | परिस्थिती |
|---|---|---|---|
| निस्तार सारखे हक्क (३(१) (ख)) | निस्तार पत्रकात नमूद सर्व | २२७८.८१ | जितक्या प्रमाणात |
| गौण वनोपज वरील हक्क (३ (१) (ग)) | सर्व्हे नंबर व वन | ,, | उपलब्ध आहे व |
| मासे मारणे | नकाशाप्रमाणे नमूद | ,, | जितके वापरले |
| जलसंपत्ती | असलेले सर्व व राजस्व | ,, | तितके |
| चराई (गुरांच्या सारखे) | नकाशाप्रमाणे | ,, | |
| मटके वा फिरते यांचेकरिता पारंपारिक संसाधन | | ,, | |
| आदिम जमाती समूह आणि कृषक पूर्वसमूहासाठी वस्तीस्थान आणि वस्ती यांची सामूहिक भूधारणा पद्धती जैवविविधता, बौद्धिक संपती वा पारंपारिक ज्ञान | तपशीलवार माहिती वेगळी जोडली आहे. | | |
| अन्य पारंपारिक हक्क | पान क्रमांक १ प्रमाणे २२७८.८१ हे. | | |

() मागणीदारान दावा अर्जाच्या खालील पुरावे / साक्ष सादर केले आहे.

(i) निस्तारपत्रक
(ii) राजस्व नकाशा
(iii) वन नकाशा
(iv) बंदोबस्त मिसल
(v) प्रत्यक्ष जमिनीवरील पुरावा
(६) ग्रामसभेची शिफारस (कलम २ (दोन) अनुसार)
(७) जैवविविधता अधिनियम २००२ चे कलम ४१
(८) जैवविविधता प्राप्त नियम २००४ चा नियम २२
(९) भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २८ ग्रामवन
(१०) महाशासन अधि एस ३० / २००० प्र. क्र. २१५१ ए ६ दि. १०/११/२००० गठित निस्तार समितीचा अहवाल.

४) खुले वाचन व सखोल तपासणी :

१. मागणीदारांच्या / समुदायांच्या पात्रतेबाबत : दावा अर्जान्वये मागणीदाराने त्याच्या पात्रतेबाबत वन हक्क समितीला दिलेले पुरावे, त्या संदर्भात दस्तऐवज व मागणीदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने वन हक्क समितीचे अहवालाचे मुद्दा क्रमांक (अनुसूचित जमातीसाठी ३ (अ) (१), (२), (३)) / (इतर पारंपारिक वन निवासी मागणीदारांसाठी ३ (म) (१), (२), (३)) चे ग्राम सभेसमोर खुले वाचन झाले व वन हक्क समितीचे अहवालाचे व निष्कर्षाची ग्राम सभेने चर्चा व सखोल तपासणी केली. या अनुषंगाने हिसंबंध असलेल्या खालील व्यक्तींचे / समुदायाचे म्हणणे / आक्षेप ऐकून घेतले.

(१) श्री. .................................. .................................. (मागणीदार)
(२) श्री. .................................. ..................................
(३) श्री. .................................. ..................................
(४) श्री. .................................. ..................................

| अ. नं. | आक्षेपाचा तपशील | ग्राम सभेचे निष्कर्ष |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

ग्राम सभेमध्ये प्रत्येक मुद्याबाबत सविस्तर खुली चर्चा झाली असून ग्राम सभेने खालीलप्रमाणे ठराव मंजूर केले आहेत.

ग्राम सभेचा ठराव.

वरील मागणीदारांच्या / समुदायाच्या पात्रतेबाबत वन हक्क समितीने अहवालातील तपशील, वन हक्क प्राप्त करण्यासाठी पात्रता / अपात्रताबाबत काढलेले निष्कर्ष तसेच हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींचे म्हणणे / आक्षेप ऐकून घेऊन आणि त्यांनी दिलेले निवेदन इ. विचारात घेता ग्राम सभेने असे ठराव पारित केले आहेत की, (खालीलपैकी लागू असेल ते ठेवावे आणि लागू नसलेले भाग खोडावे.)

मागणीदारांच्या / समुदायांच्या पात्रतेबाबत वन हक्क समितीने काढलेल्या निष्कर्षाशी ग्राम सभा खालील कारणास्तव पूर्णपणे सहमत आहे आणि मागणीदार / समुदाय उपरोक्त अधिनियमाखाली ''वन हक्क'' प्राप्त करण्यास पात्र / अपात्र आहेत.

किंवा

मागणीदारांच्या समुदायांच्या पात्रतेबाबत वन हक्क समितीने काढलेल्या निष्कर्षाशी खालील कारणास्तव ग्राम सभा असहमत आहे आणि मागणीदार / समुदाय उपरोक्त अधिनियमाखाली ''वन हक्क'' प्राप्त करण्यास पात्र / अपात्र आहेत.

(खालील रिक्त जागेत ठरावासाठी आवश्यक ते समर्थन देऊन उपरोक्त ठराव मंजूर करावे.)०६/२००९ रोजी ग्रामपंचायत सरपंच सौ. जिजाबाई कालीदास कड्यामी यांनी दिलेल्या प्रमाणांचे जाहीर वाचन करण्यात आले. त्यात त्यांनी प्रमाणित करण्यात आले की, मारदा ग्रामपंचायत मारदा या गाव समुदायाचे सर्व सदृष्य अनुसूचित वन हक्क पडताळणीच्या वेळेस वनक्षक श्री. साधुलवार यानीसुद्धा मारदा गावातील सर्व ग्रामस्थ अनुसूचित जमातीचे आहेत, असे सांगितले आहे. त्याची नोंद अहवालात आहे. वरील दोन समर्थन जे व आजचा ग्रामसभेत उपस्थित सर्वांची सहमती याद्वारे उपरोक्त ठराव सर्व सहमतीने मंजूर.

२. पात्र मागणीदारांचे / समुदायाचे वन हक्काबाबत

वरील बाबींच्या संदर्भात ग्राम सभेने खालील प्रमाणे पडताळणी केली.

१. वन हक्क समितीच्या अहवालातील मुद्दा क्रमांक ४ (अ) अन्वये वन हक्क समितीने दिलेले तपासणीतील व प्रत्येक पुराव्याबाबत वन हक्क समितीचे समाधान / असमाधान बाबत ग्राम सभेसमोर खुले वाचन झाले व वन हक्क समितीचे अहवालाचे व निष्कर्षाची ग्राम सभेने चर्चा व सखोल तपासणी केली.

२. वन हकक समितीच्या अहवालातील मुद्दा क्रमांक ४ (ब) (१) मधील नमूद तपशील, ४ (ब) (२) मधील नमूद विवरण व त्याखाली नमूद वन हक्क समितीचे पडताळणी निष्कर्ष ४ (ब) (३) मधील नमूद मोजणीचा तपशील ४ (ब) (४) मधील नमूद इतर जमिनी व मिळकतीचे स्त्रोताबाबतचा तपशील व ४ (ब) (५) मधील इतर गावातील वन जमिनीवरचा तपशील यांचे ग्राम सभेसमोर खुले वाचन झाले. या अनुषंगाने हितसंबंध असलेल्या खालील व्यक्तींचे / समुदायाचे म्हणणे / आक्षेप ऐकून घेतले.

(१) श्री. .................................. .................................. (मागणीदार)
(२) श्री. .................................. ..................................
(३) श्री. .................................. ..................................
(४) श्री. .................................. ..................................

| अ. नं. | आक्षेपाचा तपशील | ग्राम सभेचे निष्कर्ष |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

**वरील प्रमाणे हितसंबंध असलेले सर्व व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तद्वातच त्यासंबंधी सर्व दस्ताऐवजाची पाहणी केल्यानंतर काढलेले निष्कर्ष तसेच मागणीदारांच्या / समुदायांच्या वन हक्कांबाबत निष्कर्षानुसार ग्राम सभेने ठराव संमत केलेला असून ते पुढील कार्यवाहीसाठी उपविभागीय स्तरीय समितीकडे पाठविण्यात यावेत. असे सर्वानुमते ठरले. ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**सहपत्र – (वन हक्क समितीचा पडताळणीचा निष्कर्ष अहवाल + संबंधित सर्व दस्ताऐवज) (एकूण ..... पाने)**

**सचिव (नाव व सही)**
**सचिव ग्रामपंचायत**

**अध्यक्ष (नाव व सही)**

**ग्रामसभा**
**दिनांक :**

प्रथम सभेमध्ये प्रत्येक मुद्द्याबाबत सविस्तर खुली चर्चा झाली असून ग्राम सभेने खालीलप्रमाणे ठराव मंजूर केलेल आहेत. त्यापैकी लागू असेल ते ठेवावे आणि लागू नसलेले .......... खोडावे.

ग्राम सभेचा ठराव :

मागणीदारांना / समुदायांना उपरोक्त अधिनियमाखाली खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार ''वन हक्क'' देय आहे. हा ठराव मंजूर करण्यात येऊन उपविभागीय स्तरीय समितीकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा.

किंवा

मागणीदारांना / समुदायांना खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार ''वन हक्क'' देय नाही. अशाप्रकारचा ठराव मंजूर करण्यात येऊन हा ठराव उपविभागीय स्तरीय समितीकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा.

किंवा

मागणीदारांना / समुदायांना ''वन हकक'' खालीलप्रमाणे नमुद केल्यानुसार अंशतः देय आहे. अशाप्रमारचा ठराव मंजूर ........... येऊन हा ठराव उपविभागीय स्तरीय समितीकडे पुढील योग त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा.

(खालील रिक्त जागेत वन हक्क समितीचे निष्कर्षाशी सहमती / अंशतः सहमती / पूर्णपणे सहमती बाबत संक्षिप्तमध्ये लिहून वन हक्काबात ठरावांसाठी आवश्यक ते समर्थन देऊन ठराव मंजूर करणे.)

१. देय वन हक्काचा तपशील

अ) निस्तार हक्क २) गौण वन उत्पादनावरील हक्क ३) सामूहिक हक्क, जलसंपत्ती, नदी, जमीन, तलाव, बोडी, झरे, इत्यादी

ख) चराई

५) जैवविविधता हक्क ६) निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिक वनस्रोताचे संरक्षण, संवर्धन, पुनर्निमाण व व्यवस्थापन करण्याचा हक्क, देवाच्या जागा, गोहडूम यावरील हक्काकरीता मारदा गाव समूहाने निस्तार पत्रकात सर्व सर्वे नंबर क्षेत्र २२७८.७१ एकर तसेच वन नकाशाप्रमाणे कंपार्टमेंट नंबर ८८, ८९, ९०, ९१ एकूण क्षेत्र हेक्टर वन जमिनीवर सामुदायिक दावा केला आहे. तो योग्य असल्यामुळे त्याला मंजूरी देण्यात येत आहे.

**ब) सामूहिक वन हक्क दावा क्रमांक ३ (घ १) सध्या वापरत असलेल्या सामुहिक जागा (घ २) भविष्यात संकल्पित प्रकल्पासाठीच्या जागा यातील दावा केलेले काही क्षेत्र**

**(कारणे व समर्थनार्थ मजकूर खोडलेला असून मी स्वत: गावाच्या वतीने सही व शिक्का करीत आहे.):**

**सचिव (नाव व सही)**
**सचिव ग्रामपंचायत**

**अध्यक्ष (नाव व सही)**

**ग्रामसभा**
**दिनांक :**

**अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्कांची मान्यता)अधिनियम, २००६ व त्या अंतर्गत निर्गमित झालेले नियम, २००८(वन हक्क समितीचा पडताळणी निष्कर्ष – सामुदायिक दाव्यांच्या संबंधी शिफारस)नियम ११ (२) (पाच) चे अधिनस्त ग्रामसभेच्या समोर सादर(प्रपत्रात माहिती भरतांना जागा कमी आढळल्यास अतिरिक्त पाने जोडण्यात यावीत.)**

**अर्ज दावा क्र. १ ठराव क्र. १**

मागणीदाराचे / समुदायाचे नाव (यादी जोडण्यात यावी)

नाव : श्री. केशव मगाजी कड्यामी व इतर एकूण

ग्राम : मारदा ग्राम पंचायत – मारदा

तालुका – गडचिरोली

(दाव्यातील वन जमिनीसाठी जे लागू आहे ते ठेवावे. क्षेत्र व वार्षिक परिमाण लिहावे.)

| हक्काचा प्रकार | कम्पा./सर्व्हे नं. | एकर | परिणाम |
|---|---|---|---|
| निस्तार सारखे हक्क (३(१) (ख)) | निस्तारपत्रकात नमुद सर्व सर्व्हे नं | २२७८.८१ | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे व जितके वापरले तितके |
| गौण वनोपज वरील हक्क (३ (१) (ग))<br>मासे मारणे<br>जलसंपत्ती<br>चराई (गुरांच्या संख्येसह)<br>भटके वा फिरते यांचेकरिता पारंपारिक संसाधन<br>आदिम जमाती समूह आणि कृषक पूर्वसमूहासाठी वस्तीस्थान आणि वस्ती यांची सामूहिक भूधारणा पद्धती जैवविविधता, बौद्धिक संपती वा पारंपारिक ज्ञान अन्य पारंपारिक हक्क | वननकाशाप्रमाणे कंपार्टमेंट नंबर ८८, ८९, ९०, ९१ व गाव हद्दितील सर्व | तपशीलवार माहिती वेगळी जोडावी | |

(२) दाव्यांचा ............. सादर झालेला पुरावे / साक्ष

(१) निस्तारपत्रक
(२) राजस्व नकाशा
(३) वन नकाशा
(४) बंदोबस्त मिसल
(५) प्रत्यक्ष जमीनवरील पुरावा
(६) ग्रामसभेची शिफारस (कलम २ (दोन) अनुसार
(७) जैवविविधता अधिनियम २००२ चे कलम ४१
(८) जैवविविधता प्राप्त नियम २००४ चा नियम २२
(९) भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २८ ग्रामवन
(१०) ......... निर्णय क्र. एस३०/२००० प्र.क्र. २१५ क्र. ६ दि. १९/...../२००० द्वारा गठन विस्तार .........

---

(३) दावा अर्जामध्ये सादर निवेदनाच्या संदर्भात मागणीदाराच्या / समुदायाच्या पात्रतेबाबत नियम .....

अ) अनुसूचित जमातीच्या मागणीदार / समुदायासाठी

१) प्राथमिक स्वरुपात वन निवासी असल्यासंबंधीची साक्ष / पुरावा उपलब्ध आहे काय ? असल्यास त्याचा तपशील लिहा. — होय

---

तपशील :

पडताळणीच्या वेळेस सरपंच सौ. जिजाबाई कालीदास कड्यामी व सचिव (ग्रा.पं.) प्रमोद महादेव आसूटकर यांनी मारदा या गाव समुदायाचे सर्व सदस्य अनुसूचित समुदायाचे असून प्राथमिक स्वरुपात वन निवासी असल्याचे काळजीपूर्वक सांगितले व सरपंच ग्रा.प. चे (मारदा) यांनी दिलेले प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे.

(४) उपरोक्त पुराव्याबाबत वन हक्क समितीचे समाधान झाले आहे काय ? — होय

अनुसूचित जमातीचा असल्याबाबतचा पुरावा / जमाती.... दाखल्याची प्रमाणित प्रत सादर आहे काय ? तपशील लिहा — होय

---

तपशील :

सरपंच मारदा यांनी प्रमाणित केले असून ग्रा. प. सचिव यांनी त्याना अनुमोदन दिले असल्याचे समुदाय आणि पुन्हा वेगळ्या पुराव्याची आवश्यकता नाही.

उपरोक्त पुराव्याबाबत वन हक्क समितीचे समाधान झाले आहे का ? — होय

मागणीदार / समुदाय हा नियम २००८ च्या कलम २८ (ब) च्या तरतूदी प्रमाणे त्याचा उपजीविकेच्या वास्तविक गरजा आणि सदर वन जमिनीवर अवलंबून आहे काय ? होय
(माहितीसह तपशील द्यावा)

---

तपशील :

समुदाय उपजीविकेच्या वास्तविक गरजांसाठी सदर वन जमिनीवर अवलंबून आहे.
गाव हद्दीतील एकूण क्षेत्रापैकी ७५% ....... हे वन आहे. ...... कमी व... .... जास्त असल्यामुळे समुदाय सर्वच जीवनावश्यक गरजेसाठी वनावर अवलंबून आहे. होय

उपरोक्त बाबत वन हक्क समितीचे समाधान झाले आहे काय ? होय

इतर पारंपारिक वन निवासी समुदाय / मागणीदारासाठी
१ प्राथमिक स्वरुपात वन निवासी असल्यासबंधी साक्ष / पुरावा उपलब्ध आहे काय ? होय

उपरोक्त दाव्याबाबत वनहक्क समितीचे समाधान झाले आहे का ? होय

१३-१२-२००५ पूर्वी ३ पिढ्यांपासून (७५ वर्षे) वन निवासी असल्याबाबत पुराव्याची प्रत जोडावी

उपरोक्त पुराव्याबाबत वन हक्क समितीचे समाधान झाले आहे ? होय / नाही

मागणीदार / समुदाय हा नियम २८ (ब) कलम २ (ब) च्या तरतूदी प्रमाणे त्याच्या उपजीविकेचा वास्तविक गरजांसाठी सदर वन / वन जमीनीवर अवलंबून आहे काय ? होय / नाही

---

तपशील :

उपरोक्त पुराव्याबाबत वन हक्क समितीचे समाधान झाले काय ? होय / नाही

४) मागणीदाराच्या सामुदायिक वन हक्काबाबत पडताळणी
अ) पुराव्याच्या आधारावर (उपयुक्त माहितीसाठी तपशील द्यावा)

तपशील :

निस्तारपत्रक : निस्तारपत्रक हा महाराष्ट्र राज्य राजस्व संहिता १९६६ च्या तरतूदीनुसार कायदेशीर असलेला आहे. त्यात नमूद असेलल्या निस्तार हक्कासाठीचा दावा असल्याने निस्तारपत्रक राजस्व नकाशा हा यासाठी भक्कम पुरावा आहे. गौण वनउपजावरील एक .............. अधिनियमातील .... या संबंधीची व्याख्या सुस्पष्ट आहे. इमारती लाकूड सोडून बाकी सर्व गौणवज उत्पादनावर समुदायाचा स्वामीत्व हक्क कायद्यातील तरतूदी अनुसार असल्याने योग्य आहे.

जलसंपत्ती : गाव हद्दीतील संपूर्ण जल संपत्तीवर सामुदायिक हक्काचा दावा थोडा आहे. वनालगत असलेले झरे व वन तलावाची यादी नकाशासोबत जोडलेली आहे.
पुराव्याच्या आधारावर उपयुक्त ................ अधिक तपशील वेगळा जोडलेला आहे.

---

ब) प्रत्यक्ष ठिकाणी पाहणीच्या आधारावर (पाहणी दि. )
उपस्थित वन हक्क समिती सदस्य नावे. (१) श्री. काशिनाथ कड्यामी – सचिव, (२) मेधुजी पेरावी – अध्यक्ष, (३) आडकू नरोटे (४) सुकरु नरोटे (५) श्यामराव कड्यामी (६) मंदाबाई कड्यामी (७) रुक्माबाई पदा (८) गुणाबाई कड्यामी व इतर

उपस्थित मागणीदार / प्रतिनिधी नावे : केशव कड्यामी, येधुजी पोटावी, भिवाजी नरोटे

उपस्थित वन अधिकारी नावे : श्री. ए. एम. सादुलवार
वनरक्षक डातर मारदा बिट
उपस्थित इतर नावे :श्री. प्रमोद महादेव आसुटकर (सचिव ग्रा. प. मारदा)
सौ. जिजाबाई कालीदास कड्यामी (सरपंच, मारदा)
श्री. नितीन बारसिंग (वेध संस्था, गडचिरोली)

मागणीदारांचे / समुदायाचे काही इतर गावातील वन जमिनीवर या दाव्यातील हक्काचे पण आहे काय ? (.........................................................................)

---

तपशील : या संबंधात मारदा गावच्या वनहक्क समितीसोबत बोलणे झाले असून इतर गावातील वन जमिनीबाबत इथे नोंद नाही.

(६) दाव्यासंदर्भात वन हक्क समितीचा निष्कर्ष : (लागू नाही ते खोडून तपशील द्यावा)

**१) खालील कारणांमूळे सामुदायिक हक्काचा दावा पूर्णतः / खालील सुधारणा करुन मान्य करण्यायोग्य आहे.**

**मारदा गाव समुहाने मारदा गाव हद्दीतील जेवढा कंपा. नं. मध्ये नमूद केले गेले आहे तेवढा हेक्टर वनक्षेत्रावर निस्तार ........... वन उपज, मासे मारणे, जलसंपत्ती, चराई, जैवविविधता व वन व्यवस्थापनाचा केलेला दावा पूर्णतः मान्य करण्या योग्य आहे.**

**२) मारदा हद्दीतील वनक्षेत्रावर केलेल्या दावा मंजूर करण्याकरिता तो पूर्णतः योग्य आहे.**

**सहपत्र :** **(पुरावे + नकाशा + संबंधित सर्व दस्तऐवज)**

**सचिव (नाव व सही)**
**सचिव ग्रामपंचायत**

**अध्यक्ष (नाव व सही)**

**ग्रामसभा**
**दिनांक :**

i. मागणीदार / वन निस्ताराचे प्रतिनिधी / इतर यांचे द्वारे समर्थनार्थ किंवा ........... करीता सादर केलेल्या दस्ताऐवजाचे (असेल तर) विवरण :
विवरण : कोणतेही दस्तवेज (अतिरिक्त) सादर केले नाही.

ii. समर्थनार्थ / आक्षेपाकरिता सादर कलेल्या दस्ताऐवजावर वनहक्क समितीचा पडताळणीचा निष्कर्ष :
पडताळणीचा निष्कर्ष :
मागणीदार समुदायाने सामुदायिक दावा करतांना दाव्याच्या समर्थनार्थ सादर केलेले पुरावे व दस्तावेज योग्य आहेत.

१) मोजणी :

मोजणी अधिकारी नावे :

२) जमिनीचा कंपार्टमेंट क्रमांक :
प्रत्यक्ष जमिनीचे क्षेत्र / एक अंतर्गत ............. एकर)
जमिनीवर ...................... याचा तपशील द्यावा.
तपशील : मारदा गाव हद्दीतील संपूर्ण वन क्षेत्रावर समुदायाने दावा केला आहे. त्यामुळे त्याचे पुन्हा मोजमाप करण्याची आवश्यकता नाही. परंतु पडताळणी करीता नोटीस होऊनही (१) राजस्व विभागाचे प्रतिनिधी (२) ता. नि. भू. अ. यांचे प्रतिनीधी उपस्थित नव्हते.

३) जमिनीच्या सीमा / हद्दीच्या खुणा (तपशील द्यावा)
तपशील : उत्तरेला लोहगाव गावाची हद्द, दक्षिणेला जमगांव गावाची हद्द, पूर्वेला गागविती गावाची हद्द, पश्चिमेला रामनगर गावाची हद्द

४) मागणीदाराचे / समुदायाचे काही इतर वनसमितीवर या दाव्यातील हक्काचे / मिळकतीचे स्रोत आहे काय ?
असल्यास तपशील द्यावा. होय
तपशील : सामुदायीक दाव्यात क्र. ३ (घ) १ मध्ये म्हटल्याप्रमाणे सध्या वापरत असलेल्या सामुदायिक जागा व ३ (घ) २ प्रमाणे असलेल्या संकल्पित प्रकल्पासाठी जागा.

---

अ) पुराव्याच्या आधारावर (उपयुक्त माहितीसह तपशील)
तपशील :

१) निस्तार पत्रक : हा गाव समाजाच्या हक्कासाठी नोंद असलेल्या शासकिय अभिलेखात आहे. मारदा गाव समाजाचे निस्तार हक्क एकूण २२७८.८१ एकर मध्ये असल्याचे त्यात स्पष्ट नमूद आहे.

२) राजस्व नकाशा : गाव हद्दीतील संपूर्ण वन क्षेत्रावर मारदा गाव समाजाचे निस्तार हक्क परंपरेप्रमाणे व भू राजस्व संहितेप्रमाणे आहे. ते क्षेत्र राजस्व नकाशावर दाखविले असल्याने पुन्हा मोजणी करुन नकाशा तयार करण्याची आवश्यकता नाही.

३) वन नकाशा : मारदा गाव हद्दीमध्ये कोणते कंपार्टमेंट नंबर येतात हे या नकाशात दर्शविले आहे.

४) बंदोबस्त मिसल : २३.२४ पूरातन काळापासून मारदा गावसमाजाचा गाव हद्दीतील संपूर्ण वन क्षेत्रावर हक्क आहे हे या शासकीय अभिलेखामुळे सिद्ध होते.

५) प्रत्यक्ष जमीन विवरण पुरावा : पुरातन काळापासून ते आज पर्यंत मारदा गाव समाजातील सदस्य निस्तार हककाचा उपभोग घेत आहेत.

६) ग्रामसभेची शिफारस : कलम ३.८ (दोन) अनुसार सध्या वापरत असलेल्या सामूहिक जागा व भविष्यात संकल्पित प्रकल्पासाठीच्या जागा या करीता केलेल्या दाव्यात प्रत्येक प्रयोजनासाठी एक हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रात असून प्रती हेक्टर पंच्च्याहत्तर वृक्षापेक्षा अधिक वृक्ष तोडण्याची आवश्यकता नाही. कायद्यातील तरतूदी अनुसार मारदा गावाच्या ग्रामसभेने शिफारस केली आहे.

७) जैवविविधता अधिनियम २००२ चे कलम ४१

८) जैवविविधता अधिनियम २००२ चा नियम २२ :

या तरतूदी अनुसार गाव पातळीवरील जैवविविधता व्यवस्थापन समिती त्या जैवविविधता संरक्षण टिकावू उपयोग व उत्पन्नात ........... वाटा यांचे अधिकार दिले आहेत. सुयोग्य नियोजनाकरिता ''गावाचे जैवविविधता नोंद रजिस्टर'' तयार करुन त्याचा उपयोग करावा असे नियम २२ मध्ये म्हटले आहे.
मारदा गाव समाजाने या हक्काच्या दावा केलेला आहे.

९) भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २८ ग्रामवन :

गाव सभोवतालच्या वनाचे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन त्या गाव समाजानेच करावे या करिताच कायद्यात ही तरतूद अनेक वर्षापूर्वीपासून आहे. परंतु त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यासाठी हा दावा असल्याने अगदीच योग्य आहे.

१०) निस्तार आढावा समितीचा अहवाल :

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एस ८०/२०००/प्र.क्र. २१५/पृ. ६, दि. १०/११/२००० द्वारा गठीत निस्तार आढावा समितीने सुयोग्य निस्तार व्यवस्थापनासाठी गावासभोवतीचे निस्तारासाठी गाव समाजाला आवश्यक असलेल्या वन भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम २८ अनुसार ग्रामवन घोषित करुन गाव समाजाच्या स्वाधीन करावे अशी शिफारस केली आहे. त्या अनुसारही मारदा गाव समाजाने केलेला दावा अगदी योग्य असाच आहे.

११)परिस्थितीजन्य पुरावा : परंपरेअनुसार जिथे नियमित पूजा केली जाते, अशा देवाच्या जागा दावा केलेल्या वन क्षेत्रात आहेत. त्याची यादी दाव्यात दिलेली आहे. या जागा सर्व गावकऱ्यांना लहानपनापासून परंपरेने माहिती आहेत. तसेच दावा केलेल्या वन क्षेत्रातील प्रत्येक भागासाठी मारदा गाव समाजाने ठेवलेली व परंपरेने चालत आलेली त्यांच्या भाषेतील नावे आहेत.

१२) जिथे गोहडूम तिथे बांबू : जिथे जिथे गोहडूमच्या जागा आहेत, तिथे तिथे मोठी झाडे कमी प्रमाणात आहेत. कोदो, कूरकी इ. पारंपारिक वाणांची शेती बंद झाल्यावर तिथे बांबू मोठ्या प्रमाणात वाढला हा सुद्धा गावाचा एक महत्त्व पूर्ण पुरावा आहे.

सौ. जिजाबाई कड्यामी

ग्रामपंचायत, मारदा

श्री. प्रमोद महादेव आसुटकर
सचिव
ग्रामपंचायत, मारदा

# ग्रामपंचायत कार्यालय, मारदा

## पंचायत समिती, गडचिरोली, जि. गडचिरोली

दिनांक २५/०५/१००९

### प्रमाणपत्र

गट ग्रामपंचायत मारदा कडून प्रमाणपत्र देण्यात येते की, मारदा ग्रा. पं., मारदा या गाव समुदायाचे सर्व सदस्य अनुसूचित जमातीचे असून प्राथमिक स्वरुपात वन निवासणे आहेत करीता सबब प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण : ग्रा. पं. मारदा

सौ. जिजाबाई कड्यामी

ग्रामपंचायत, मारदा

श्री. प्रमोद महादेव आसुटकर
सचिव
ग्रामपंचायत, मारदा

# सभेच्या कामकाजाचा वृत्तांत (कारवाई अहवाल)

**(मुंबई ग्रामपंचायत (सभाबाबत) नियम, १९५९)**

**ग्रामपंचायत कार्यालय ..... मारदा........ पंचायत समिती .....गडचिरोली....... जिल्हा परिषद .....गडचिरोली.......**

**(१) सभेचा प्रकार : दर महा होणाऱ्या सभा / खास सभा / तहकुब सभा (२) सभेची नोटीस काढण्याचा दिनांक ....१७/०६/२००९..... (३) सभेचा क्रमांक ३**

**(४) सभेचा दिनांक : ...२६/६/२००९.... (५) सभेची वेळ : .......दु.१२.००....... (६) सभेचे स्थळ : ...समाज मंदिर, मारदा......**

**(७) सभेला हर असलेले इतर व्यक्ती : लोक प्रतिनिधी / निमंत्रित/अधिकारी/इतर**

| हजर असणाऱ्या सदस्यांची नांवे | कार्यक्रम पत्रिकेतील विषय व क्रमांक | सुचक व अनुमोदक | प्रस्तावावरील चर्चा | प्रस्तावावरील चर्चेत आवश्यकतेनुसार योग्य वेळेस सचिवांचा फायदेशीर सल्ला | ठरावावर अनुकूल नावे | ठरावावर प्रतिकुल नावे | ठरावावर तटस्थ नावे | ठराव | | हजर सदस्यांची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | मंजूर | नामंजूर | |
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | |
| ग्रामसभेत हाजरी रजिस्टर नुसार १ ते ३० ग्रामसभा सभासद | | | ठराव क्रमांक १ वन अधिकार मान्यता अधिनियम २००६ चे कलम ३.२ नुसार शिफारस आजच्या उपरणीत सभेत मारदा गाव समाजाने सदस्य वावरत असलेल्या सामुहिक जागा व आदिवासी विकास प्रकल्पासाठी जागा या करीता केलेल्या सामुदायिक सामुहिक वनहक्क दाव्याअंतर्गत प्रस्तावाला मंजूरी देऊन शिफारस करण्यात येत आहे. ठराव सार्वमताने मंजूर. | | | | | | | |

# सभेच्या कामकाजाचा वृत्तांत (कारवाई अहवाल)

**(मुंबई ग्रामपंचायत (सभाबाबत) नियम, १९५९)**

**ग्रामपंचायत कार्यालय ..... मारदा........ पंचायत समिती .....गडचिरोली....... जिल्हा परिषद .....गडचिरोली.......**

**(१) सभेचा प्रकार : दर महा होणाऱ्या सभा / खास सभा / तहकुब सभा (२) सभेची नोटीस काढण्याचा दिनांक ....२८/०१/२००९..... (३) सभेचा क्रमांक २१**

**(४) सभेचा दिनांक : ...६/०२/२००९.... (५) सभेची वेळ : .......दु.१२.००....... (६) सभेचे स्थळ : ...समाज मंदिर, मारदा......**

**(७) सभेला हर असलेले इतर व्यक्ती : लोक प्रतिनिधी / निमंत्रित/अधिकारी/इतर**

| अनु. क्र. | हजर असणाऱ्या सदस्यांची नांवे | कार्यक्रम पत्रिकेतील विषय व क्रमांक | सुचक व अनुमोदक | प्रस्तावावरील चर्चा | प्रस्तावावरील चर्चेत आवश्यकतेनुसार योग्य वेळेस सचिवांचा फायदेशीर सल्ला | ठरावावर अनुकूल नावे | ठरावावर प्रतिकुल नावे | ठरावावर तटस्थ नावे | ठराव मंजूर | ठराव नामंजूर | हजर सदस्यांची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | ग्रामसभेत हाजरी रजिस्टर नुसार १ ते ५१ ग्रामसभा सभासद | | | ठराव क्रमांक ३ (८) मौजा मारदा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गावांना सामुहिक दावे कागदपत्र सादर करण्याबाबत मुदत वाढ मिळणे बाबत.<br><br>विषयान्वये आजच्या जागेत चर्चा करण्यात आली की, मारदा ग्रामपंचायत अंतर्गत मारदा जल्लेर केळीगट्टा व तोहगाव हि गावे येत असून हेमागावे १००% माडीया असून येथील वन निवासी अधिनियम २००६ व २००८ अन्वये सामुहिक दावे सादर करणे करीता ३-४ महिन्यांची मुदतवाढ मागण्यात यावी असे ठरवून ठराव सार्व मताने मंजूर. | | | | | | | |

**भारत सरकार**

**जनजाती कार्य मंत्रालय**

**अनुसूचित जनजाती व इतप पारंपारिक वन निवासी वन हक्क मान्य करणे नियम २००७**

**वन जमिनीच्या सामूहिक हक्कांसाठीच्या दाव्यांचा अर्ज**

**(पहा नियम ११ (१) (क) व (४))**

१. मागणीदाराचे / मागणीदारांचे नांव :

| अ. क्र. | नाव | सही / अंगठा |
|---|---|---|
| १ | केशव मंगाजी कड्यामी | |
| २ | येसुजी सैनू पोटावी | |
| ३ | आडकू नरसू नराटे | |
| ४ | बाजीराव येसू पोटावी | |
| ५ | शामराव घासी कड्यामी | |
| ६ | हरीदास भिवा कड्यामी | |
| ७ | निर्मला जनिराम पदा | |
| ८ | जिजाबाई कालीदास कड्यामी | |
| ९ | शिवाजी आडकू नरोटे | |
| | आणि मारदा गावातील सर्व ग्रामस्थ – नावे सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे | |

| | | |
|---|---|---|
| १ (क) | अनुसूचित जमातीचा समूह | होय / नाही |
| १ (ख) | इतर पारंपारिक वननिवासींचा समुह | होय / नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | गांव | मारदा | ३. ग्रामपंचायत | मारदा |
| ४. | तालुका | गडचिरोली | ५. जिल्हा | गडचिरोली |

ग्राम : मारदा, ग्रामपंचायत : मारदाख ता. गडचिरोली, जि. गडचिरोली

**लाभ घेतलेल्या सामूहिक हक्काचे स्वरूप :**

१) निस्तार यासारखे सामूहिक हक्क, काही असल्यास (पहा अधिनियम कलम ३ (१) (ख))

| सामूहिक हक्काचे नांव | सर्व्हे नं. व कंपा. नं. | क्षेत्र | परिणाम |
|---|---|---|---|
| राजस्व अभिलेखातील मारदा गावाच्या नावे असलेल्या निस्तार पत्रकात नमूद केलेले सर्व निस्तार हक्क | १. निस्तार पत्रकात नमुद सर्व सर्वे नं., कंपा. नं. ८८, ८९, ९०, ९१<br>२. वन नकाशा प्रमाणे सर्व कंपा. नं. ८८, ८९, ९०, ९१ सर्वे नं. | एकूण २२७८.८१ ए. | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे व जितके वापरतो तितके |

सूचना : निस्तार पत्रक, नकाशा व वन नकाशा शासनाकडेच असल्यामुळे त्यांच्या प्रती जोडलेल्या नाहीत.

२) गौण वनोत्पादनावरील हक्क काही असल्यास .....

| सामूहिक हक्काचे नांव | सर्व्हे नं. व कंपा. नं. | क्षेत्र | परिणाम |
|---|---|---|---|
| बांबु, खरटी, झाडी, खोड, कोसा, मध, मेण, लाख, तेंदू,<br>पत्ता, औषधी वनस्पती, कंदमुळे, आवळा, हिरडा, बेहडा, डिंक, बिबा, चारोळी,<br>मोह, टोळी, लहान खोडे, यांच्यासारखी इमारती लाकुड नसलेली सर्व वनोत्पादने यांचे स्वामित्त्व हक्क | १. निस्तार पत्रकात नमुद सर्व<br>२. सर्वे नं., कंपा. नं. वन नकाशा प्रमाणे सर्व<br>कंपा. नं. ८८, ८९, ९०, ९१ सर्वे नं. | एकूण २२७८.८१ ए. | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे व जितके वापरतो तितके |

सूचना : निस्तार पत्रक, नकाशा व वन नकाशा शासनाकडेच असल्यामुळे त्यांच्या प्रती जोडलेल्या नाहीत.

ग्राम : मारदा, ग्रामपंचायत : मारदा ता. गडचिरोली, जि. गडचिरोली

लाभ घेतलेल्या सामूहिक हक्काचे स्वरूप :

(३) सामूहिक हक्क :

| (क) वापर किंवा हक्कदारी असलेले | सर्व्हे नं. व कंपा. नं. | क्षेत्र | परिणाम |
|---|---|---|---|
| जलसंपत्ती – गावहद्दीतील व इतर वापरात असलेल्या ठिकाणचे उपलब्ध सर्व पाणी<br>१) नदी–पोर<br>गावहद्दीला लागुन असलेला व जवळचा भाग<br>२) झरे (पाण्याच्या जागा)<br>२.१)सराड २.२) हातोरकसा<br>२.३)विटाळकसा २.४) कलकसा<br>२.५)मुयतोनतला २.६) जपकसा<br>२.७)हिताकसा २.८) पानघाट<br>२.९)बंडाकसा २.१०) आंबेझरण<br>२.११) मेंडहुरी २.१२) टिटेरहादी<br>२.१३) होदेकसा<br>२.१४) फुलकूंडूम<br>२.१५) हेरमडोडा<br>२.१६) नेलडोडा<br>२.१७) खंडारडोडा<br>२.१८) गरांजकसा<br>२.१९) पोरनाला<br>२.२०) मालगुजारी तलाव<br><br>३) रेती व गाळाची माती<br>४) जलचर प्राणी व वनस्पती – मासे, खेकडे, शिंपले, घोघले, कासव, शिंगाडे व कसुरमाटी इ. | १. निस्तार पत्रकात नमुद सर्व सर्वे नं., कंपा. नं.<br>२. वन नकाशा प्रमाणे सर्व कंपा. नं. ८८, ८९, ९०, ९१ सर्वे नं. | एकूण २२७८.४२ हे. | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे व जितके वापरतो तितके |

सूचना : निस्तार पत्रक, नकाशा व वन नकाशा शासनाकडेच असल्यामुळे त्यांच्या प्रती जोडलेल्या नाहीत.

ग्राम : मारदा, ग्रामपंचायत : मारदा ता. गडचिरोली, जि. गडचिरोली

३) सामूहिक हक्क – मागील पानावरुन सुरू

| सामूहिक हक्काचे नांव | सर्व्हे नं. व कंपा. नं. | क्षेत्र | जनावरांची संख्या |
|---|---|---|---|
| (ख) चराई –<br>राजस्व अभिलेखातील<br>मारदा<br>गावाच्या नावे असलेल्या<br>निस्तार पत्रकात नमूद<br>केलेले<br>सर्व निस्तार हक्क | १. निस्तार पत्रकात नमूद<br>सर्व<br>सर्वे नं., कंपा. नं. ८८,<br>८९,<br>९०, ९१<br>२. वन नकाशा प्रमाणे सर्व<br>कंपा. नं. ८८, ८९,<br>९०, ९१ सर्वे नं. | एकूण २२७८.८१<br>एकर | जितकी आहे<br>तितकी |

सूचना : निस्तार पत्रक, नकाशा व वन नकाशा शासनाकडेच असल्यामुळे त्यांच्या प्रती जोडलेल्या नाहीत.

(घ) १. सध्या वापरात असलेल्या सामुहिक जागा.

| वापरात असलेल्या जागा | सर्व्हे नं. व कंपा. नं. | कंपा. नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १) प्राथमिक शाळा<br>२) अंगणवाडी<br>३) संयुक्त वन व्यवस्थापन<br>भवन<br>४) स्मशानभूमी<br>५) गाव समाज सभा<br>कार्यालय | ९१<br>नकाशा –<br>वापरात असलेल्या<br>जागा<br>दाखविणारा नकाशा<br>सोबत<br>जोडलेला आहे. | ८८, ८९, ९०, ९१ | २.१० हेक्टर |

सूचना : राजस्व नकाशा व वन नकाशा शासनाकडेच असल्यामुळे त्यांच्या प्रती जोडलेल्या नाहीत.

(घ) २. भविष्यात संकल्पित प्रकल्पांसाठी जागा.

| प्रस्तावित प्रकल्प | कंपा. नं. | परिणाम |
|---|---|---|
| १) मध प्रक्रिया उद्योग (मानव विकास मिशन अंतर्गत) | वन नकाशा प्रमाणे कंपा. नं. | ०.८५ हेक्टर |
| | | ०.८५ हेक्टर |
| २) अपारंपारिक उर्जा निर्मिती प्रकल्प | ८८, ८९, ९०, ९१, ९२ | ०.८५ हेक्टर |
| ३) ग्रामसभा भवन | नकाशा – | ०.८५ हेक्टर |
| ४) उद्योग प्रशिक्षण केंद्र | संकल्पित प्रकल्पाच्या | ०.८५ हेक्टर |
| ५) मोटुल व पल्ला | जागा | ०.८५ हेक्टर |
| ६) पाणीपुरवठा योजना | दाखविणारा नकाशा | ०.८५ हेक्टर |
| ७) स्वस्त धान्य योजना | सोबत | ०.८५ हेक्टर |
| ८) आरोग्य केंद्र | जोडला आहे.. | ०.८५ हेक्टर |
| ९) वीज पुरवठा | | ०.८५ हेक्टर |
| १०) शाळा | | ०.८५ हेक्टर |
| ११) व्यायाम शाळा | | ०.८५ हेक्टर |
| १२) रस्ता व फाटा | | ०.८५ हेक्टर |
| १३) बाजार | | ०.८५ हेक्टर |
| १४) धार्मिक उत्सव पर्यटन स्थळ | | ०.८५ हेक्टर |
| १५) ग्रंथालय व अभ्यास केंद्र | | ०.८५ हेक्टर |
| १६) वन आधारित उद्योग वसाहत | एकूण | १३.७६ हेक्टर |

ग्राम : मारदा, ग्रामपंचायत : मारदा ता. गडचिरोली, जि. गडचिरोली

लाभ घेतलेल्या सामूहिक हक्काचे स्वरूप :

(५) जैविक विविधता, बौद्धीक संपत्ती व पारंपारिक ज्ञान यांच्यावरील हक्क, अधिनियम कलम (३) १ (ट) :

| हक्काचा प्रकार | तपशिल |
|---|---|
| जैविक विविधतेचे संरक्षण, संवर्धन आणि व्यवस्थापन करण्याचा हक्क तसेच बौद्धीक संपत्ती व पारंपारिक ज्ञान यांच्यावरील हक्क | जैव विविधता आधिनियम २००२ मधील कलम ४१ व नियम २००४ मधील नियम २२ मध्ये असलेल्या तरतुदी अनुसार |

## (६) अन्य पारंपारिक हक्क काही असल्यास पहा अधिनियम कलम ३ (१) (झ)

| हक्काचा प्रकार | कंपा. नं. | क्षेत्र | तपशिल |
|---|---|---|---|
| ६.१ निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिक वन स्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन, पुनर्निमाण व व्यवस्थापन करण्याच हक्क<br>६.२ देवाच्या जागा (पेन्कना जागा (कंपा नं))<br>६.२.१ माराई माता (माऊली माता)<br>६.२.२ तल्लुर मुत्ते (ठाकुर देव)<br>६.२.३ माड्याल पेन<br>६.२.४ भिमसेन<br>६.२.५ सराडमेटा<br>६.२.६ गडमाता<br>६.२.७ माड्यानगुड्रा<br>६.२.८ दिवाळीचा पूजा (आकर)<br>६.२.९ दिवाळ बिधाव (जल्लेर मारदा शिव)<br>६.२.१० सिमगा विधाव (ज. मारदा शिव)<br>६.२.११ दसरा विधव (नदीच्या काठी)<br>६.२.१२ बुढालपेन<br>६.२.१३ मर्दगुटा<br>६.२.१४ गुमतिली<br>६.२.१५ मुलेमुते पहाडूंगा<br>६.२.१६ कसनकल<br>६.२.१७ हातोरकसा (देवजागा)<br>६.२.१८ पूळपोली<br>६.२.१९ सराडमेटा | १. निस्तार पत्रकात नमूद सर्व सर्वे नं., कंपा. नं.<br>२. वन नकाशा प्रमाणे सर्व कंपा. नं. ८८, ८९, ९०, ९१ | २२७८.८१ एकर | १) मारदा गावसमाज, गावहद्दीतील सदर वनाचे व्यवस्थापन परंपरेने व २००४ पासून महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीणांच्या सहभागातून संयुक्त वनव्यवस्थापन योजनेत सहभागी होवून करीत आहे.<br>२) भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम २८ प्रमाणे ग्रामवन घोषित करुन ते व्यवस्थापनासाठी मारदा गाव समाजाकडे हस्तांतरित करण्यांत यावे.<br>३) जैवविविधता अधिनियम २००२ व नियम २००४ अनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारा जैवविधता व्यवस्थापन समित्यांचे गठन व सबलीकरण.<br>४) परंपरेतील व जुन्या कायद्यातील चांगल्या गोष्टी यांची अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वन निवसी (वन अधिकार मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ सोबत सांगड घालणे.<br>नकाशा – देवाच्या जागा व गोहडूमच्या जागा सोबत जोडलेल्या नकाशात दाखविल्या आहेत. गोहडूमच्या जागांना कुटुंबाची नावे असली तरी त्यावर सामुदायिक हक्क होता व आहे. |

(७) पुष्ट्यर्थ पुरावा (पहा नियम कलम – १३)

| हक्काचा प्रकार | पुरावे |
|---|---|
| १. निस्तार हक्क<br>२. गौण वनोत्पादन हक्क<br>३. सामूहिक हक्क<br>३.१ (क) वापर किंवा हकदारी असलेले जलसंपत्तीचे हक्क<br>३.२ (ख) चराईचे हक्क<br>३.३ (घ) १. वापरात असलेल्या जागा<br>(घ) २. भविष्यात संकल्पीत प्रकल्पासाठी जागा<br>५. जैविक विविधता, बौद्धिक संपत्ती व पारंपारीक ज्ञान यांच्यावरील हक्क<br>६. अन्य पारंपारिक हक्क<br>६.१ निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिक वन स्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन पुनर्निर्माण व व्यवस्थापन करण्याचा हक्क<br>६.२ देवाच्या जागा<br>६.३ गोहडूम – कोदो, कुटकी इ. पारंपारिक उत्पादनांच्या जागा | १. निस्तार पत्रक<br>२. राजस्व नकाशा<br>३. वन नकाशा<br>४. बंदोबस्त मिसल सन २२–२४<br>५. प्रत्यक्ष जमिनीवरील पुरावा<br>६. ग्रामसभेची शिफारस (कलम २ (दोन) अनुसार)<br>७. जैवविविधता अधिनियम २००२ चे कलम ४१<br>८. जैवविधता नियम २००४ चा नियम २२<br>९. भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २८ ग्रामवन<br>१०. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एस ३०/२००/प्रक्र २१५/फ–६ दि. १०.११.२००० द्वारा गठित निस्तार आढावा समितीचा अहवाल<br>११. परिस्थितीजन्य पुरावा<br>१२. जिथे गोहडूम होते त्या जागी बांबू मोठ्या प्रमाणात आलेला दिसतो. |

(८) अर्ज दिनांक रोजी प्राप्त झाला.

८.१ वर पुरावे म्हणून नमूद केलेल्या क्रमांक १, २, ३, ४, ७, ८, ९ व १० च्या पुराव्याचे मूळ अभिलेख व दस्ताऐवज शासनाकडेच असल्यामुळे त्याच्या सत्य प्रतीलिपी सोबत जोडलेल्या नाहीत.

८.२ नियम १२ (४) अनुसार वन विभागाकडे मागितलेली माहिती अजून मिळालेली नाही.

सही

नाव

**भारत सरकार**

**जनजाती कार्य मंत्रालय**

**अनुसूचित जनजाती व इतर पारंपारिक वन निवासी वन हक्क मान्य करणे नियम २००७**

**वन जमिनीच्या सामूहिक हक्कांसाठीच्या दाव्यांचे अर्ज**

**(पहा नियम ११ (१) (क) व (४))**

**पान नं. १ वरुन पुढे**

**१. मागणीदारांचे / मागणीदारांचे नाव : ग्रामसभा : मारदाख ग्रा.पं. मारदा, ता. जि. गडचिरोली.**

| अ.क्र. | नाव | सही / अंगठा |
|---|---|---|
| १० | बुधू झिट्टी कड्यामी | |
| ११ | देवू बाबू कड्यामी | |
| १२ | देवलाबाई वासुदेव कोराम | |
| १३ | रुक्माबाई माधव आतला | |
| १४ | बेबीबाई मालू पोटावी | |
| १५ | सुनंदाबाई फकीरा कड्यामी | |
| १६ | जाईबाई जोगी पदा | |
| १७ | निर्मला रामदास कड्यामी | |
| १८ | राजूबाई भिवा कड्यामी | |
| १९ | गोपाळ झुंगा कोडाप | |
| २० | सोगीबाई बुधू कड्यामी | |
| २१ | शामराव देवू कड्यामी | |
| २२ | माधव रेनू आतला | |
| २३ | जीवन फकीरा कड्यामी | |
| २४ | गेंजूबाई कोतला पवा | |
| २५ | राजू धानू पदा | |
| २६ | रामदास भिवा कड्यामी | |
| २७ | वेणुबाई गोपाळ कोडाप | |
| २८ | रघुनाथ बुधू कड्यामी | |

**अश्याप्रकारे एकूण ११८ ग्रामस्थांनी सामूहिक हक्कांच्या दाव्यांच्या अर्जावर अंगठे व सहया केल्या**

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी
(वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६
आणि
नियम, २००८

**ऐतिहासिक अन्याय झाल्याची कबूली**

कोणत्याही कायद्याची प्रस्तावना खूप महत्त्वपूर्ण असते. त्यामुळे त्या कायद्याचे उद्दिष्ट काय आहे, याचा खुलासा होत असतो. भारत का राजपत्र असाधारण, भाग पहिला, खंड १ दि. २ जानेवारी २००७ मध्ये इंग्रजीत ही प्रस्तावना आहे. पण आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य – पुणे यांनी कायद्याचा अनुवाद देताना मात्र या प्रस्तावनेचे मराठी भाषांतर देण्याचे टाळले आहे, म्हणून तुमच्या माहितीकरता प्रस्तावनेचा आम्ही केलेला मराठी अनुवाद खालील प्रमाणे :

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६
२००७ चा क्रमांक २ (२९ डिसेंबर २००६)

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी जे अनेक पिढ्यांपासून वनात राहात आहेत, परंतु ज्यांच्या वनहक्कांची नोंद घेतली गेली नाही, त्यांच्या वन हक्कांना मान्यता देण्यासाठी व तसे करण्यासाठी आवश्यक पुरावा याची सुनिश्चिती करुन प्रक्रिया ठरवून देण्यासाठी हा कायदा करण्यात येत आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासींच्या मान्यताप्राप्त वनहक्कांमध्ये त्यांच्या उपजीविकेची व अन्नसुरक्षेची खात्री देत असतानाच शाश्वत उपयोग, जैवविविधतेचे संरक्षण आणि परिसंस्थेचे संतुलन टिकवून ठेवणे व त्याद्वारे वनसंरक्षणाची प्रक्रिया मजबूत करण्याची जबाबदारी व अधिकार यांचाही समावेश आहे.

“इंग्रजी वसाहतीच्या काळात किंवा त्यानंतर स्वतंत्र भारतातही वन बंदोबस्त करत असताना अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासींचे त्यांच्या परंपरागत जमिनी व वास्तव्य असलेल्या भूप्रदेशावरील वनहक्क यांना योग्य प्रकारे मान्यता देण्यात आली नव्हती. वन परिसंस्थेचे जिवंत राहणे ज्या अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांच्यासोबत अभिवाज्यपणे जोडले गेले आहेत, त्यांच्यावर त्यामुळे ऐतिहासिक अन्याय झाला आहे.”

आणि ज्याअर्थी राज्य विकासाच्या हस्तक्षेपामुळे ज्यांच्यावर विस्थापित होण्याची जबरदस्ती करण्यात आली होती, अशा वनांवर अवलंबून असलेल्या अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वननिवासी यांच्या वनहक्क धारण करण्याच्या व वनात प्रवेश करण्याच्या हक्कांबाबतच्या प्रलंबित असुरक्षिततेच्या भावनेची दखल घेणे आवश्यक झाले होते.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.
यांनी छापलेल्या प्रस्तुत पुस्तिकेतून सोबत जोडलेली माहिती घेण्यात आली आहे. अधिक तपशीलासाठी वरील संस्थेकडून पुस्तिका मागवून घ्यावी.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६

## प्रकरण एक

प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ

१.(१) या अधिनियमास ''अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६'' असे म्हणावे.

(२) तो जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करुन संपूर्ण भारतास लागू आहे.

(३) केंद्र सरकार, राजपत्रातील आधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, तो अंमलात येईल.

व्याख्या

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर --

(क) ''सामूहिक वन साधने'' याचा अर्थ, गावाच्या पारंपारिक किंवा रुढीगत सीमांतर्गत असणारी किंवा फिरस्ता आदिवासी समाजाच्या बाबतीत भूप्रदेशाचा तसेच राखीव वनांचा, संरक्षित वनांचा आणि समाजाला पारंपारिक प्रवेश असणारी अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने यासारख्या सुरक्षित क्षेत्रांचा (मोसमी) वापर असणारी रुढिगत सामायिक वन जमीन, असा आहे.

(ख)''संकटग्रस्त वन्यजीवांचे वसतिस्थान'' याचा अर्थ सरकारने नियुक्त केलेल्या स्थानिक तज्ञांचा अंतर्भाव असणाऱ्या आणि ज्यामध्ये आदिवासी कार्य मंत्रालयाचे प्रतिनिधी देखील अंतर्भुत असतील अशा तज्ञ समितीने विचारविनिमय केल्यावर केंद्र सरकारच्या पर्यावरण व वनीकरण मंत्रालयाने कलम ४ ची पोटकलमे (१) व (२) च्या कार्यपद्धतीच्या स्वरुपाच्या गरजांमधून निर्धारित केली अशी क्षेत्र, निश्चित व अधिसूचित केल्यानुसार वन्य प्राणी संवर्धनाच्या प्रयोजनासाठी, अबाधित ठेवलेली, राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये, असा आहे.

(ग)''वन निवासी अनुसूचित जमाती'' याचा अर्थ, मुख्यत्त्वेकरुन वनात राहणारे अनुसूचित जमातीचे सदस्य किंवा समाज, असा आहे आणि त्यामध्ये अनुसूचित जमातीचे फिरस्ता आदिवासी समाज, जे वनांवर किंवा उपजीविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनांवर किंवा वनजमिनींवर अवलंबून असलेला समाज यांचा समावेश होतो;

(घ)''वन भूमी'' याचा अर्थ, कोणत्याही वन क्षेत्रात येणारी कोणत्याही वर्णनाची जमीन, असा आहे, आणि त्यामध्ये, वर्गीकरण न केलेली वने, सीमांकित न केलेली वन, अस्तित्वात असलेली किंवा मानीव वने, संरक्षित वने, राखीव वने, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने यांचा समावेश होतो;

(ड)''वन हक्क'' याचा अर्थ, कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेले वन हक्क, असा आहे;

(च)''वन ग्राम'' याचा अर्थ, वनीकरणाच्या कामांसाठी कोणत्याही राज्य शासनाच्या वन विभागाद्वारे वनांमध्ये स्थापन केलेल्या किंवा वन आरक्षण प्रक्रियेद्वारे वन ग्रामांमध्ये रुपांतरीत केलेल्या वसाहती असा आहे. आणि त्यामध्ये वन वसाहत ग्रामे, निश्चित मागणीच्या धारणजमिनी, लागवडीसाठी आणि शासनाने परवानगी दिलेल्या इतर वापरासाठी असलेल्या जमिनींचा अंतर्भाव असलेल्या ग्रामांसाठी ठेवण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या योग्य वसाहती – मग त्या कोणत्याही नावाने ओळखल्या जात असोत – यांचा समावेश होतो.

(छ)''ग्राम सभा'' याचा अर्थ, गावातील सर्व प्रौढ सदस्यांची मिळून बनलेली ग्राम सभा आणि पंचायत नसलेल्या राज्यांच्या बाबतीत पाडे, टोले व अन्य पारंपारिक ग्राम संस्था आणि महिलांचा पूर्ण व अनिर्बंध सहभाग असलेल्या निर्वाचित ग्राम समित्या असा आहे;

(ज)''वसतिस्थान'' यामध्ये, रुढिगत वसतिस्थानाचा समावेश असलेल्या क्षेत्रांचा आणि आदिम जमाती गट, कृषि–पूर्व समाज आणि अन्य वननिवासी अनुसूचित जमाती यांच्यासाठी, राखीव आणि संरक्षित वनांमध्ये असलेल्या वसतिस्थानांचा समावेश होतो;

(झ)''गोण वनोत्पादन'' यामध्ये, बांबू, खुरटी झाडी, खोड, वेत, कोसा, रेशमी किड्यांचे कोश, मध, मेण, लाख, तेंदू किंवा केंदू पत्ता, औषधी वनस्पती आणि कंदमुळे, मुळे, लहाने खोडे यांच्यासारख्या इमारती लाकूड नसलेल्या सर्व वनोत्पादनांचा समावेश होतो;

(ञ)''मध्यवर्ती अभिकरण'' याचा अर्थ, कलम ११ मध्ये विनिर्दिष्ट केलेली मध्यवर्ती अभिकरण, असा आहे;

(ट)''अधिसूचना'' याचा अर्थ, राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसूचना असा आहे.

(ठ)''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;

(ड)''अनुसूचित क्षेत्रे'' याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्देशलेली अनुसूचित क्षेत्रे, असा आहे.

(ढ)''निरंतर वापर'' याला जैविक विविधता अधिनियम, २००२ (२००३ चा १८) याचे कलम २, खंड (ण) मध्ये जो अर्थ नमूद केला असेल, तोच अर्थ असेल;

(त) ''ग्राम'' याचा अर्थ, --

(एक) पंचायत तरतुदी (अनुसूचित क्षेत्रांपर्यंत विस्तार) अधिनियम, १९९६(१९९६ चा ४०) याच्या कलम ४, खंड(ख) मध्ये निर्देशिलेले ग्राम किंवा

(दोन)पंचायतीशी संबंधित कोणत्याही राज्य विधिमध्ये ग्राम म्हणून निर्देशाण्यात आलेले अनुसूचित क्षेत्रांव्यतिरिक्त कोणतेही क्षेत्र; किंवा

(तीन)वन ग्रामे, जुनी वस्ती किंवा वसाहती आणि भूमापन न केलेली ग्रामे, मग ती ग्राम म्हणून अधिसूचित करण्यात आलेली असोत अगर नसोत; किंवा

(चार) पंचायत नसेल, अशा राज्यांच्या बाबतीत कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे पारंपारिक ग्राम,

(थ) ''वन्य प्राणी'' याचा अर्थ, वन्य जीवन (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ५२) याच्या अनुसूची एक ते चार यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आणि निसर्गामध्ये वन्य स्वरुपात आढळणाऱ्या प्राण्यांच्या कोणत्याही प्रजाती, असा आहे.

## प्रकरण दोन

### वनहक्क

वन निवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांचे सामूहिक हक्क :

३. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सुरक्षित वैयक्तिक किंवा सामूहिक किंवा दोहोंचे धारणाधिकार म्हणून असलेले पुढील हक्क वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांचे वनहक्क असतील.

(क)वननिवासी अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांच्या सदस्याने किंवा सदस्यांनी वस्ती करण्यासाठी किंवा स्वत:च्या उपजीविकेकरिता शेती करण्यासाठी वैयक्तिक किंवा सामायिक व्यवसाय म्हणून वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क;

(ख)पूर्वीच्या संस्थानांमध्ये वापरले जाणारे आणि कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारे 'निस्तार'सारखे हक्क, जमीनदारी किंवा, अशा मध्यम अवस्थांमधील पद्धती;

(ग) गावच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केल्या जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्यांची विल्हेवाट लावणे यासाठीचा स्वामित्त्व हक्क;

(घ) पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे (प्रस्थापित वा तात्पुरती अशा दोन्ही स्वरूपाची) पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास भटक्या किंवा फिरस्ता आदिवासी समाजास मुभा असणे यासारखे इतर सामाजिक हक्क असणे किंवा त्यास तो हक्कदार असणे;

(ङ) आदिम जमाती समूह आणि कृषिपूर्व समाज यांच्या निवासाचे व निवासस्थानाचे हक्क तसेच सामाजिक धारणाधिकार;

(च) जेथे दाव्यांवर विवाद होतात अशा कोणत्याही राज्यातील, कोणत्याही नावाने ओळखले जाणारे विवादास्पद जमिनींवरील किंवा त्या संबंधातील हक्क;

(छ)वनजमिनीवरील पट्टा किंवा भाडेपट्टा किंवा अनुदान याचे मालकी हक्कांमध्ये रुपांतरण करण्यासाठी, कोणतेही स्थानिक प्राधिकरण किंवा राज्य शासन यांनी दिलेला हक्क;

(ज)सर्व वन ग्रामे, जुनी वसतिस्थाने, भूमापन न कलेली गावे आणि अन्य गावे – मग ती महसुली गावे म्हणून अभिलिखित, अधिसूचित केलेली असोत किंवा नसोत – यांची वसाहत करण्याचा हक्क;

(झ)निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वन–स्त्रोताचे संरक्षण, पुनर्निमाण, संवर्धन किंवा व्यवस्थापन करण्याचा हक्क;

(ञ)कोणत्याही राज्य विधीअन्वये किंवा स्वायत्त जिल्हा परिषद किंवा स्वायत्त प्रादेशिक परिषद यांच्या विधीअन्वये मान्यता दिलेले हक्क किंवा कोणत्याही राज्याच्या कोणत्याही पारंपारिक किंवा रूढिगत कायद्याखाली आदिवासींचे हक्क म्हणून स्वीकारलेले हक्क;

(ट)जैविक विविधतेत प्रवेश मिळविण्याचा हक्क आणि जैविक विविधता व सांस्कृतिक विविधता यांच्याशी संबंधित बौद्धिक मालमत्ता व पारंपारिक ज्ञान मिळविण्याचा सामूहिक हक्क.

(ठ)खंड (क) ते (ट) मध्ये नमूद केलेले परंतु वननिवासी अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, इतर पारंपारिक वननिवासी यांच्याकडून उपभागण्यात येत असलेले, शिकार करणे किंवा जाळ्यात पकडणे किंवा वन्य प्राण्याच्या एखाद्या प्रजातीच्या शरीराचा भाग कापून घेणे या रूढिगत हक्कांखेरीज अन्य पारंपारिक हक्क.

(ड)ज्या ठिकाणी अनुसूचित जमाती व इतर (पारंपारिक) वननिवासी यांना १३ डिसेंबर, २००५ पूर्वी, त्यांची वैध हक्कदारी डावलून कोणत्याही स्वरुपाच्या वन जमिनीतून अवैधरित्या निष्कासित किंवा विस्थापित करण्यात आले असेल तर त्यांचे पर्यायी जमिनीसह मूळ स्वरुपात पुनर्वसन करण्याचा हक्क.

१९८० चा ६९ (२). वन (संवर्धन) अधिनियम १९८० यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकार पुढील सुविधांकरिता वन जमिनी खुल्या करण्याची तरतूद करील आणि यात दर हेक्टरी पंच्याहत्तर वृक्षांपेक्षा अधिक नाहीत इतके वृक्ष पाडता येतील व त्याचे व्यवस्थापन सरकारकडून करण्यात येईल :–

(क) शाळा
(ख) दवाखाना किंवा रुग्णालय
(ग) आंगणवाड्या
(घ) विद्युत व दूरसंदेशवाहक तारा
(ड) रास्त धान्य दुकाने
(च) टाक्या किंवा अन्य गौण जलाशये
(छ) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व जलवाहिन्या
(ज) पाणी किंवा पावसाच्या पाण्यावरील शेतीची संरचना
(झ) लहान सिंचन कालवे
(त्र) अपारंपारिक ऊर्जा साधने
(ट) कौशल्यामध्ये वाढ करणारी किंवा व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे
(ठ) रस्ते आणि
(ध) सामाजिक केंद्रे

परंतु असे की, पुढील बाबतीतच केवळ वन जमिनी अशा प्रकारे खुल्या करण्यात येतील,

(एक) या पोटकलमात नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी प्रत्येक प्रकरणात केवळ एक हेक्टरपेक्षा कमी असलेल्या प्रयोजनार्थ वन जमीन खुली करण्यात येईल, आणि

(दोन) अशा विकास प्रकल्पांचा निपटारा त्याची (प्रकल्पाची) ग्राम सभेकडून शिफारस करण्याच्या अधीन राहून करण्यात येईल.

(वरील सुविधा म्हणजे केवळ सामूहिक हक्क नव्हेत, तर प्रकरण दोनमध्ये असलेले सर्व अधिकार ''सामूहिक हक्क'' म्हणून मानायला हवेत.)

## प्रकरण तीन

वनहक्कांची मान्यता, त्यांचे पुन:स्थापन व ते निहित करणे व तत्संबंधी बाबी.
वन निवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांच्या वनहक्कांना मान्यता देणे व ते निहित करणे.

४. (१) त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि या अधिनियमाच्या तरतूदींना अधीन राहून केंद्र सरकार याद्वारे,

(क) राज्यातील किंवा जेथे, कलम ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व वन हक्कांच्या बाबतीत ज्यांना अनुसूचित जमाती म्हणून घोषित करण्यात आले आहे त्या, राज्यातील क्षेत्रातील वननिवासी अनुसूचित जमातींना;

(ख) कलम ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व वन हक्कांच्या बाबतीत इतर पारंपारिक वननिवासींना हक्क मान्य व निहित करीत आहे.

(२) राष्ट्रीय उद्याने व अभयारण्यातील चिंताजनक वन्यजीवन वसतिस्थान यांतील या अधिनियमान्वये मान्यता मिळालेल्या वन हक्कात सुधारणा करता येईल व त्यांचे पुन:स्थापन करता येईल. परंतु वन हक्कधारक, पुढील सर्व शर्तींचे समाधान झाल्याशिवाय वनजीवन संवर्धनाकरिता अबाधित क्षेत्र निर्मिती करण्याच्या प्रयोजनार्थ पुनस्थापित होणार नाही किंवा त्यांच्या हक्कांना कोणत्याही रीतीने बाधा पोहचणार नाही; त्या अशा

(क) सर्व क्षेत्रात, कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे हक्कांना मान्यता देण्याची व ते विहित करण्याची प्रक्रिया विचारात घेणे.

(ख) वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ५३) अन्वये आपल्या अधिकारांचा वापर करताना राज्य शासनाच्या संबंधित अभिकरणाने, धारणधिकार असणाऱ्यांच्या हालचाली किंवा त्यांची उपस्थिती यामुळे वन्य प्राण्यांवर होणारा परिणाम हा उक्त प्रजाती आणि त्यांची वसतिस्थाने यांची भरुन न काढता येण्याजोगी हानी होण्यास किंवा त्या धोक्यात येण्यास, पुरेसे कारण होईल असे सिद्ध करणे.

(ग) राज्य शासनाने सहजीवन अस्तित्वात नाही, असे योग्य पर्याय समाप्त करणे.

(घ) बाधित व्यक्ती व समूह यांच्याकरिता सुरक्षित उपजीविका पुरविण्यासाठी आणि प्रस्तुत विधी व केंद्र सरकारच्या धोरणात दिलेल्या अशा बाधित व्यक्ती व समूह यांच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी पुन:स्थापना करणे किंवा पर्यायी योजना तयार करणे व संसूचित करणे.

(ड) प्रस्तावित पुन:स्थापनेसाठी व योजना – लेखी स्वरुपात मिळवण्यासाठी संबंधित क्षेत्रातील ग्रामसभेची संमती मोफत कळविणे.

(च) वचन दिलेल्या योजनेप्रमाणे सुविधा व पुन:स्थापनेच्या ठिकाणी जमीन वितरण पूर्ण केल्याशिवाय पुन:स्थापना घडून येणार नाही.

परंतु, वन्य जीव संवर्धनाच्या प्रयोजनाकरिता अशा रीतीने पुन:स्थित करीत आहेत. अशा हक्क धारकांकडून चिंताजनक वन्यजीव वसतिस्थाने किंवा इतर वस्तू, वापरांसाठी, राज्य शासन किंवा केंद्र सरकार लगेचच दिशा बदलणार नाही.

(३) या अधिनियमा अन्वये, वननिवासी अनुसूचित जमातीना वन भूमी व त्यांची वसतिस्थाने या बाबतीतील कोणतेही राज्य किंवा संघराज्य क्षेत्र यांच्या संबंधातील इतर पारंपारिक वननिवासींना वन हक्कांची मान्यता देणे व ते निहित करणे अशा अनुसूचित जमाती किंवा जमाती समूह यांच्या शर्तींच्या अधीन असेल किंवा इतर पारंपारिक वननिवासी १३ डिसेंबर, २००५ च्या पूर्वी वनभूमी संपादित करील.

(४) पोट–कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या हक्क वारसागामी असेल मात्र अन्य संक्राम्य किंवा हस्तांतरणीय नाही किंवा विवाहित व्यक्तींच्या बाबतीत नवरा बायको या दोघांच्याही नावाने संयुक्तपणे नोंद घेण्यात येईल. आणि एकाच व्यक्तीचे प्रमुख असलेल्या कुटुंबाच्या बाबतीत एकाच प्रमुखाच्या नावे नोंद करण्यात येईल व थेट वारस नसेल तर वारसा हक्क निकटतम नातेवाईक देण्यात येईल.

(५) अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, मान्यतेची व पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाल्याखेरीज, वननिवासी अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांच्या सदस्याला, त्याच्या भोगवाट्यातील वनभूमीतून निष्कासित करण्यात किंवा काढून टाकण्यात येणार नाही.

(६) पोट कलम (१) द्वारे मान्य व निहित करण्यात आलेल वनहक्क कलम ३, पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये नमूद केलेल्या जमिनींच्या बाबतीत, अशी जमीन, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाला व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या किंवा समाजाच्या भोगवट्याखाली असेल आणि ती प्रत्यक्ष भोगवट्यासाठी असलेल्या क्षेत्रापुरती मर्यादित असेल आणि कोणत्याही परिस्थितीत चार हेक्टरपेक्षा अधिक असणार नाही.

(७) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० (१९८० चा ६९) अन्वये हक्क निर्वेध करण्यासह, वनहक्क, सर्व भारापासून व प्रक्रियात्मक आवश्यकतांपासून मुक्तपणे प्रदान करण्यात येतील, या अधिनियमात विनिर्दिष्ट करण्यात आले आहे त्याखेरीज वनजमिनीच्या रुपांतरासाठी ''निव्वळ चालू मूल्य'' व ''पूरक वनरोपण'' प्रदान करण्याची आवश्यकता असेल.

(८) या अधिनियमान्वये मान्य व निहित करण्यात आलेल्या वन हक्कांमध्ये आपल्या निवास स्थानातून आणि लागवडीच्या जमिनीमधून आपल्याला सरकारी विकास कामांच्या अडथळ्यांमुळे जमीनरुपी भरपाई न देता विस्थापित करण्यात आले असे सिद्ध करणाऱ्या आणि नंतर ज्यांची जमीन, ती संपादित पाच वर्षात ती ज्यासाठी संपादित केली होती त्या प्रयोजनार्थ वापरण्यात आली नसेल अशा वननिवासी अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वननिवासी यांच्या जमिनीवरील हक्कांचा समावेश होतो.

वनहक्क धारकाची कर्तव्ये

५ या अधिनियमान्वये, कोणताही वनहक्क धारक,

(क) वन्य जीवन, वन व जैविक विविधता यांचे संरक्षण करणे;

(ख) लगतची पाणलोट क्षेत्रे, जल स्त्रोत व पारिस्थितिकीदृष्ट्या अन्य संवेदनाक्षम क्षेत्रे पुरेशी संरक्षित आहेत याची सुनिश्चिती करील.

(ग) वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांचे निवासस्थान, त्यांच्या सांस्कृतिक व नैसर्गिक वारसाला कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचेल अशा, कोणत्याही प्रकारच्या विघातक प्रथांपासून सुरक्षित ठेवले असल्याची सुनिश्चिती करील;

(घ) सामाजिक वनांचे स्त्रोत मिळविण्याच्या मार्गांचे विनियमन करणे आणि वन्य प्राणी, वन व जैविक विविधता यांवर प्रतिकूल परिणाम करणारी कोणतीही कृती थांबविणे यांच्यासाठी ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयांचे अनुपालन केले जात असल्याची सुनिश्चिती करील.

## प्रकरण चार

### वनहक्क निहित करण्यासाठी प्राधिकार व कार्यपद्धती

वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांचे वनहक्क निहित करण्याचे प्राधिकार आणि त्याची कार्यपद्धती

६ (१) या अधिनियमान्वये ग्रामसभेला दिल्या गेलेल्या स्थानिक मर्यादांमध्ये वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना, वैयक्तिक किंवा सामूहिक किंवा दोहोंसाठी द्यावयाच्या वनहक्कांचे स्वरुप आणि त्यांची व्याप्ती ठरविण्याची प्रक्रिया सुरु करणारे ग्रामसभा हे एक प्राधिकरण असेल, ही प्रक्रिया त्यांच्याकडून दावे प्राप्त करुन, ते एकत्रित करुन, त्यांची पडताळणी करुन आणि अशा हक्कांचा वापर करण्यासाठी विहित केलेल्या रीतीने शिफारस केलेल्या प्रत्येक मागणीचे क्षेत्र निश्चित करणारा नकाशा तयार करुन केली जाईल व त्यानंतर ग्रामसभा, तशा आशयाचा ठराव संमत करुन, त्यांची प्रत उपविभाग स्तरीय समितीकडे पाठवेल.

(२) ग्रामसभेच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती पोटकलम (३) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या उपविभाग स्तरीय समितीकडे विनंती अर्ज दाखल करील आणि उपविभाग स्तरीय समिती अशा विनंती अर्जांवर विचार करुन तो निकाल काढील.

(३)राज्य शासन, ग्रामसभेने संमत केलेले निर्णय तपासण्यासाठी उपविभाग स्तरीय समिती गठीत करील आणि वनहक्काचे अभिलेख तयार करुन तो अंतिम निर्णयासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा स्तरीय समितीकडे पाठवील.

(४)उपविभाग स्तरीय समितीच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती उपविभाग स्तरीय समितीच्या निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत जिल्हा स्तरीय समितीकडे विनंती अर्ज दाखल करील आणि जिल्हा स्तरीय समिती अशा विनंतीअर्जावर विचार करुन तो निकालात काढील.

परंतु असे की, उपविभाग स्तरीय समितीकडे दाखल करण्यात आल्याखेरीज आणि तिने त्यावर विचार केला असल्याखेरीज, ग्रामसभेच्या निर्णयाविरुद्धचा कोणताही विनंती अर्ज थेट जिल्हा स्तरीय समितीपुढे दाखल करण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय असा कोणताही विनंतीअर्ज व्यथित व्यक्तीच्या विरुद्ध निकालात काढला जाणार नाही.

(५)राज्य शासन, उपविभाग स्तरीय समितीने तयार केलेल्या वनहक्कांच्या अभिलेखावर विचार करुन त्यांना अंतिम मान्यता देण्यासाठी जिल्हा स्तरीय समिती गठीत करील.

(६)वनहक्काच्या अभिलेखावरील जिल्हा स्तरीय समितीचे निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

(७)राज्य शासन, वनहक्कांना मान्यता देण्याच्या व ते निहित करण्याच्या प्रक्रियेचे संनियंत्रण करण्याकरिता आणि जर नोडल एजन्सीने मागणी केल्यास अशी विवरणे व असे अहवाल तिला सादर करण्याकरिता, एक राज्य स्तरीय संनियंत्रण समिती गठीत करील.

(८)उपविभाग स्तरीय समिती, जिल्हा स्तरीय समिती व राज्य स्तरीय संनियंत्रण समिती या विहित करता येईल अशा समुचित स्तरावर, राज्य शासनाच्या महसूल, वन व आदिवासी कार्य विभागाच्या अधिकारी आणि त्या त्या स्तरावरील पंचायती राज्य संस्थांनी योग्य त्या स्तरावर नेमलेले तीन सदस्य राहतील. त्यापैकी दोन सदस्य अनुसूचित जमातीपैकी असतील व किमान एक महिला सदस्य असेल.

(९)उपविभाग स्तरीय समिती, जिल्हा स्तरीय समिती व राज्य स्तरीय संनियंत्रण समिती यांची रचना व कार्ये आणि त्यांची कार्ये पार पाडताना त्यांची अनुसरावयाची कार्यपद्धती, ही विहित केल्याप्रमाणे असेल.

के. एन. चतुर्वेदी,
भारत सरकार.

# सामूहिक हक्कासाठीच्या दाव्याचा नमुना

भारत सरकार
जमाती कार्य मंत्रालय
अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००८
नमुना – ख
सामूहिक हक्कासाठीच्या दाव्याचा नमुना
(पहा नियम ११ (१) (क) च (४))

१. मागणीदाराचे / मागणीदारांचे नांव :
   क. वन निवासी अनुसूचित जामातीचा समूह : होय / नाही
   ख. इतर जमाती वन निवासींचा समूह : होय / नाही
२. गाव :
३. ग्रामपंचायत :
४. तहसील / तालुका :
५. जिल्हा
:

लाभ घेतलेल्या सामूहिक हक्कांचे स्वरुप

१. निस्तार यासारखे सामूहिक हक्क, काही असल्यास :
   (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ख))
२. गौण वनोत्पादनावरील हक्क, काही असल्यास :
   (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ग))
३. सामूहिक हक्क :
   क. वापर किंवा हक्कदारी असलेले (मासे, जलनिकाय), काही असल्यास,
   ख. चराई, काही असल्यास
   ग. भटके व फिरते आदिवासी यांच्याकरिता पारंपारिक साधनांची सुगमता, काही असल्यास
   (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (छ))
४. पीटीजी व कृषक–पूर्व समूहांसाठी वसतिस्थान व वस्ती यांची सामूहिक भूधारणा पद्धती, काही असल्यास :
   (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ड))
५. जैविक विविधता, बौद्धिक संपत्ती व पारंपारिक ज्ञान यांच्या हक्कांची सुगमता, काही असल्यास, :
   (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ट))
६. अन्य पारंपारिक हक्क, काही असल्यास :
   (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (झ))
७. पृष्ठयर्थ पुरावा : (पहा नियम १३) :
८. कोणतीही अन्य माहिती :

मागणीदाराची / मागणीदारांची
सही / अंगठ्याचा ठसा

भारत सरकार
जमाती कार्य मंत्रालय
अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००८
सामूहिक वनहक्कांचे हक्क
जोडपत्र–तीन
(पहा नियम ८ (ज))

| | | |
|---|---|---|
| १. | सामूहिक वनहक्कधारकाचे नाव / धारकांची नावे | : |
| २. | गाव / ग्रामसभा | : |
| ३. | ग्रामपंचायत | : |
| ४. | तहसील / तालुका | : |
| ५. | जिल्हा | : |
| ६. | अनुसूचित जमाती आहे की / इतर पारंपरिक वन निवासी आहे | : |
| ७. | सामूहिक हक्कांचे स्वरुप | : |
| ८. | शर्ती काही असल्यास | : |
| ९. | रुढीप्राप्त सीमांसह / किंवा खासरा / खंड क्र. | : |
| | यासह ठळक सीमाचिन्हे दर्शवून केलेले सीमांचे वर्णन | : |

सामूहिक वन हक्क धारकाचे नाव (धारकांची नांवे)

१.

२.

३.

आम्ही खालील सही करणारे महाराष्ट्र शासन यांच्यासाठी व त्यांच्या वतीने, सामूहिक वनहक्कांच्या उपरोल्लिखित धारकांना शीर्षकात उल्लेखिल्याप्रमाणे वनहक्क कायम करण्यासाठी आमच्या स्वाक्षऱ्या करीत आहोत.

विभागीय वन अधिकारी / उपवन संरक्षक

जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी

जिल्हाधिकारी / उपायुक्त

**प्रस्तुत भूमीअभिलेख राज्यपाल श्री. ज्ञमीर यांच्या हस्ते दिनांक १५ डिसेंबर २००९ रोजी मारदा व मेंढा (लेखा) यांच्या स्वाधीन करण्यात आला.**

भारत सरकार
जमाती कार्य मंत्रालय
अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे)
अधिनियम २००६, नियम, २००८
सामूहिक वन हक्कांचे हक्क
जोडपत्र – तीन
(पहा नियम – ८ (ज))
जिल्हा प्रकरण क्रमांक : २२०१/०९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सामूहिक वन हक्कधारकाचे नांव / धारकांची नांवे | : | श्री. केशव मंगाजी कड्यामी व इतर गावं समाज मारदा |
| २. | गांव / ग्रामसभा | : | मु. पो. मारदा |
| ३. | ग्रामपंचायत | : | मारदा |
| ४. | तहसिल / तालुका | : | गडचिरोली |
| ५. | जिल्हा | : | गडचिरोली |
| ६. | अनुसूचित जमाती आहे की / इतर पारंपारिक वन निवासी आहे. | : | अनुसूचित जमाती |
| ७. | सामूहिक हक्कांचे स्वरुप | : | गांव समाजाचे दाव्यातील बाब क्र. १, २, ३, ४, ५, ६, प्रमाणे निस्तार हक्क व इतर वरील नियमाप्रमाणे लागू असलेले हक्क |
| ८. | शर्ती काही असल्यास | : | शासनाचे नियमाप्रमाणे |
| ९. | रुढी प्राप्त सीमांसह / किंवा खासरा/ खंड क्र. यासह ठळक सीमांचिन्हे दर्शवून केलेले सीमांचे वर्णन | : | निस्तार पत्रकाप्रमाणे कंपा. नं. ८८, ८९ सर्वे नं. ९०, ९१ एकूण क्षेत्र २२७८.८१ एकर |

सामूहिक वन हक्क धारकांचे नांव (धारकांची नांवे)

१. मौजा मारदा येथील समस्त नागरिक.
२. निस्तार पत्रकातील तरतुदी नुसार गौण वनस्पती
३. कायदेशीर हक्कांना मान्यता देण्यात येते.
४. दाव्यातील १, २, ३, ४, ५, ६ प्रमाणे निस्तार हक्क व इतर सर्व हक्क मान्य.

आम्ही खालील सही करणारे महाराष्ट्र शासन यांच्यासाठी व त्यांच्या वतीने, सामूहिक वनहक्कांच्या उपरोल्लिखित धारकांना शिर्षकात उल्लेखिल्याप्रमाणे वनहक्क कायम करण्याससाठी आमच्या स्वाक्षऱ्या करीत आहोत. निस्तार पत्रकात नमूद असलेले ख. नं. पूर्नर मोजणी नंतर बदलले असलेल्याने नवीन सर्व्हे नंबर नुसार ते लागू होतील. ज्या जमिनी पूर्वी वाटप झाल्या व आता वैयक्तिक वन हक्क देण्यात येत आहे त्या वगळून उर्वरित जमिनीवर सामूहिक हक्क लागू राहतील.

विभागीय वन अधिकारी / उप वन संरक्षक
गडचिरोली

अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग,
नागपूर

जिल्हाधिकारी / उपायुक्त

भारत सरकार
जमाती कार्य मंत्रालय
अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे)
अधिनियम २००६, नियम, २००८
सामूहिक वन हक्कांचे हक्क
जोडपत्र – तीन (पहा नियम – ८ (ज))
जिल्हा प्रकरण क्रमांक : २२०१/०९

| | | |
|---|---|---|
| १. | सामूहिक वन हक्कधारकाचे नांव / धारकांची नांवे | : श्री. बिरजू जोगी तोफा व इतर गावकरी गावं समाज (लेखा) (मेंढा) |
| २. | गांव / ग्रामसभा | : मु. पो. (लेखा) (मेंढा) |
| ३. | ग्रामपंचायत | : लेखा |
| ४. | तहसिल / तालुका | : धानोरा |
| ५. | जिल्हा | : गडचिरोली |
| ६. | अनुसूचित जमाती आहे की / इतर पारंपारिक वन निवासी आहे. | : अनुसूचित जमाती |
| ७. | सामूहिक हक्कांचे स्वरुप | : गांव समाजाचे दाव्यातील बाब क्र. १, २, ३, ४, ५, ६, प्रमाणे निस्तार हक्क व इतर वरील नियमाप्रमाणे लागू असलेले हक्क |
| ८. | शर्ती काही असल्यास | : शासनाचे नियमाप्रमाणे |
| ९. | रुढी प्राप्त सीमांसह / किंवा खासरा/ खंड क्र. यासह ठळक सीमांचिन्हे दर्शवून केलेले सीमांचे वर्णन | : आराजी. १८०९.६१ हेक्टर कंपा. नं. सर्वे नं. ४६८, ४६९, ४७०, ४७१, ५११ |

सामूहिक वन हक्क धारकांचे नांव (धारकांची नांवे)

१. मौजा लेखा (मेंढा) येथील समस्त नागरिक.
२. निस्तार पत्रकातील तरतुदी नुसार गौण वनस्पती
३. कायदेशीर हक्कांना मान्यता देण्यात येते.
४. दाव्यातील १, २, ३, ४, ५, ६ प्रमाणे निस्तार हक्क व इतर सर्व हक्क मान्य.

आम्ही खालील सही करणारे महाराष्ट्र शासन यांच्यासाठी व त्यांच्या वतीने, सामूहिक वनहक्कांच्या उपरोल्लिखित धारकांना शिर्षकात उल्लेखिल्याप्रमाणे वनहक्क कायम करण्यासाठी आमच्या स्वाक्षऱ्या करीत आहोत. निस्तार पत्रकात नमूद असलेले ख. नं. पुन: मोजणी नंतर बदलले असलेल्याने नवीन सर्व्हे नंबर नुसार ते लागु होतील. ज्या जमिनी पूर्वी वाटप झाल्या व आता वैयक्तिक वन हक्क देण्यात येत आहे त्या वगळून उर्वरित जमिनीवर सामूहिक हक्क लागू राहतील.

विभागीय वन अधिकारी / उप वन संरक्षक
गडचिरोली

अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग,
नागपूर

जिल्हाधिकारी / उपायुक्त

## NCAS Publication

- महाराष्ट्रातील आदिवासींचा जाहीरनामा- आदिवासींच्या मागण्या
- अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती:आमूलाग्र सुधारणांची गरज
- आदिवासी आणि रोजगाराचा अधिकार
  नंदुरबार जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याची सद्यस्थिती
- आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे -एक टिपण
- आदिवासी उपयोजना
- महाराष्ट्रातील आदिवासीं पाणी हक्कापासून वंचित-महाराष्ट्र राज्य पाणी धोरण २००३
- महाराष्ट्रातील आदिवासी प्रशासन

---

- छत्तीसगढ़ एकीकृत स्वास्थ्य एवं जनसंख्या नीति २००६ - एक समीक्षा
- लोहाण्डीगुडा मुद्दे के संदर्भ मे विधायी पहल के लिए : नागरिक सारपत्र
- तीसरी विधानसभा-छत्तीसगढ़ अदिवासी नजरिये से

---

- Adivasis And Climate Change
- The Anti-sez Movement In India - An Account Of The Struggle In Maharashtra
- National Mineral Policy 2008- A Review
- The Adivasi's Unending Wait For Justice- National Tribal Policy 2006(draft)
- Adivasi Issues & 15th Lok Sabha: An Introductory Note
- No Respite For Displaced Adivasis
- Cross-party Parliamentary Forums

ए आर सी आदिवासींच्या हक्कासाठी काम करत आहे. ज्ञान व संसाधने यांची निर्मिती, सुसंघटन आणि वितरण यांद्वारा आदिवासी आणि शासनसंस्था यांमधील माहितीची दरी कमी करण्यासाठी आणि लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्था यांच्यामध्ये संवाद निर्माण करण्यासाठी आदिवासी संसाधन केंद्र प्रयत्नशील आहे.




atha studio:9881231865

## राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केंद्र
## (एन.सी.ए.एस.)

ज्ञान व माहिती यांच्या पायावर वंचित घटकांची वकिली करणारी संस्था ही एन.सी.ए.एस. ची ओळख आहे. वंचित व्यक्ती व सामाजिक कार्यगटांचे सामर्थ्य वाढवून त्यांच्या मूलभूत अधिकारांशी व सामाजिक न्यायाशी संबंधित मुद्यांवर वकालत करण्यास त्यांना सक्षम बनविणे हा याचा मुख्य उद्देश आहे. हे केंद्र आता आदिवासी संसाधन केंद्र (ए आर सी) या माध्यमातून आदिवासी व प्रशासन यांमधील माहीतीचे अंतर भरून काढण्याचा प्रयत्न करीत आहे.

NCAS
FACILITATING SOCIAL CHANGE

**नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडीज**
सेरेनिटी कॉम्प्लेक्स, रामनगर कॉलनी,
पाषाण, पुणे - ४११०२१
फोन ०२० - २२९५२००३/४
www.ncasindia.org